# झिरो टॉलरन्स हेच आमचे धोरण

## ईडी, सीबीआयवरून होणाऱ्या टीकेला पंतप्रधान मोदींचे प्रत्युत्तर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वृत्तवाहिन्या आणि वृत्तसंस्थांना मुलाखती देत आहेत. अशाच एका मुलाखतीत त्यांनी देशातील भ्रष्टाचार, मनी लॉण्डरिंगची प्रकरणे आणि त्याविरोधात अंमलबजावणी संचालनालय (ईडी), केंद्रीय गुन्हे अन्वेशण विभाग (सीबीआय), आयकर विभागासह (आयटी) इतर केंद्रीय तपास यंत्रणांकडून होणाऱ्या कारवाईवर तसेच त्या कारवाईनंतर केंद्र सरकारवर होणाऱ्या टीकेवर रोखठोक मते मांडली. ते आयएएनएसशी बोलत होते.



पंतप्रधान मोदी म्हणाले, पूर्वी देशात चर्चा केली जायची की, कितीही भ्रष्टाचार केला तरी त्यांच्यावर कारवाई होत नाही. केवळ लहान-मोठ्या लोकांवरच कारवाई होते. आम्ही मात्र भ्रष्टाचाऱ्यांविरोधात कडक कारवाई करीत आहोत, भ्रष्टाचार करणारे मोठे मासे केंद्रीय तपास यंत्रणांच्या गळाला लागत आहेत, तर आता म्हटले जातेय की, अमुक-तमुक लोकांवर कारवाई का करताय? मला कळत नाही की, या लोकांना नेमके काय हवे आहे.

भ्रष्टाचाराविरोधातील कारवाईवरून प्रश्न उपस्थित करणाऱ्यांना माझे एकच सांगणे आहे की, भ्रष्टाचाऱ्यांविरोधात देशात जी कारवाई सुरू आहे ती स्वतंत्र केंद्रीय तपास यंत्रणा करीत आहेत. यात आमची काहीच भूमिका नाही. झिरो टॉलरन्स हेच आमचे धोरण आहे तसेच तथ्य आणि पुराव्यांच्या आधारावर कारवाई करायला हवी, असे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटले.

भ्रष्टाचारातील मोठे मासे केंद्रीय तपास यंत्रणांच्या गळाला लागले तर काहीजण आम्हाला विचारू लागले आहेत की या लोकांना का पकडताय? मला कधी कधी कळत नाही की, ही कुठली खान मार्केट गँग आहे, जी काही ठराविक लोकांना वाचवू पाहतेय? अशी कोणती टोळी आहे जी आपल्याच देशाविरोधात जनमत तयार करू पाहतेय? आपले प्रशासन ईमानदारीने काम करतेय, तर काही लोक उगाच आरडाओरड करू लागले आहेत.

ते पुढे म्हणाले की, भ्रष्टाचार करणारे मोठे मासे आता पकडले जातायेत, तर काहीजण उगाच विरोध करीत आहेत. मला त्यांना सांगायचे आहे की, मनी लॉण्डरिंग, भ्रष्टाचार आणि भ्रष्टाचार करणाऱ्यांविरोधात कारवाई करणाऱ्या ज्या संस्था आहेत, त्या स्वतंत्रपणे काम करीत आहेत तसेच त्या आरोपींना किंवा गुन्हेगारांना तुरुंगात ठेवायचे किंवा नाही ठेवायचे, त्यांच्यावरील खटला योग्य आहे किंवा अयोग्य आहे? याचा निर्णय न्यायालय करते.

आपले न्यायालय त्यांच्यावर कारवाई करते, शिक्षा सुनावते, जामीन देते. त्यामध्ये मोदीची कोणतीही भूमिका नाही किंवा सरकारचाही त्यात कुठल्याही प्रकारचा सहभाग नसतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# जे गांजा पिऊन लेख लिहितात त्यांच्यावर मी बोलत नाही -फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

जे लोक गांजा पिऊन लेख लिहितात त्यांच्यावर मी बोलत नाही. मी आधीच तुम्हाला सांगितले आहे की, संजय राऊतांबाबत मला विचारत जाऊ नका. मी ऐकलंय ते लंडनमध्ये आहेत. तिथे चांगले मानसोपचार तज्ज्ञ आहेत. त्यांनी योग्य ते औषधोपचार घ्यावे, असा टोला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगावला आहे.

उद्धव ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशावर पुतीनप्रमाणे राज्य केले आणि देशाला गुलाम बनवले आहे. दहा वर्षांमध्ये गुलाम जन्माला घातले' असे दै. सामनातील रोखठोक सदरात म्हटले होते. या लेखाबाबत प्रश्न विचारला उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या खास शैलीत राऊत यांना टोला लगावला.

निवडणूक निकालानंतर पंतप्रधानपदी नरेंद्र मोदीच विराजमान होतील. आम्ही बहुमत



पार केले आहे. आम्हाला अभूतपूर्व यश मिळणार आहे. मोदीजी पुन्हा एकदा देशाचे पंतप्रधान होणार आहेत. शपथविधी कधी होईल हे मी सांगू शकत नाही, पण निश्चितपणे मोदीच पुन्हा पंतप्रधान होतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी व्यक्त केला.

खासदार संजय राऊत यांनी त्यांच्या रोखठोक या सदरात भाजप आणि या पक्षाच्या नेत्यांबाबतही गंभीर दावे केले आहेत. राऊत यांनी, गडकरी यांचा नागपुरात पराभव व्हावा यासाठी मोदी-शाह-फडणवीसांनी एकत्र प्रयत्न केले. गडकरींचा पराभव होत नाही याची खात्री पटल्यावर फडणवीस हे नाइलाजाने नागपुरात प्रचारात उतरले. गडकरींच्या पराभवासाठी सर्व प्रकारची रसद फडणवीस यांनीच पुरवली, हे संघाचेच लोक नागपुरात उघडपणे बोलताना दिसतात असे लेखात म्हटले आहे. त्याचप्रमाणे आता भाजपचे सरकार आले, तर अमित शाह हे योगी आदित्यनाथ यांना घरी पाठवतील, असा दावाही राऊतांनी केला आहे. या दाव्यांना भाजपकडून प्रत्युत्तर देण्यात आले आहे.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांच्या अधिकृत एक्स हँडलवर यासंदर्भात भूमिका स्पष्ट केली आहे. याशिवाय सुधीर मुनगंटीवार, प्रवीण दरेकर यांनीही संजय राऊतांना प्रत्युत्तर दिले. दुसरीकडे काँग्रेस नेते विकास ठाकूर यांनीही संताप व्यक्त केला आहे. राऊत यांनी महाविकास आघाडीचे बंधन त्यांनी पाळावे. नाहीतर त्यांच्याविरोधात आम्ही खूप बोलू शकतो, असा इशारा त्यांनी दिला. त्यानंतर आता उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी राऊत यांना सुनावले आहे.

# पाच टन लोखंडी सळई चोरणारा गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पाच टन लोखंडी वजनाच्या सळईची चोरी करणाऱ्या आरोपीस पनवेल तालुका पोलिसांनी गजाआड केले आहे.

पनवेलजवळील पुष्पक नगर येथे एका बांधकाम व्यावसायिकाचे एका मोठ्या प्रोजेक्टचे काम सुरू असल्याने प्रोजेक्टसाठी लागणाऱ्या लोखंडी सळया या नागपूर येथून एका खासगी ट्रेलरमधून मागविण्यात आल्या होत्या, परंतु त्या मालापैकी पाच टन लोखंडी सळईची चोरी झाल्याची तक्रार दाखल होताच परिमंडळ २चे पोलीस उपायुक्त विवेक पानसरे व पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हर्षद राजपूत यांनी सखोल तपास सुरू केला असता, गुन्ह्यातील आरोपी हा बीड येथे चोरीच्या मालासह लपल्याची माहिती मिळाली.

त्यानुसार तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या आधारे आरोपी चालक उस्मान कासम सय्यद (३६) याला मुद्देमालासह ताब्यात घेतले आहे. याबाबत पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक हर्षद राजपूत करीत आहेत.

# रेवदंड्यात पर्यटकांच्या वाहनांची गर्दी

## वाहतूक कोंडीने स्थानिकही हैराण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मे महिन्यातील शेवटचा वीकेण्ड असल्याने मुरूडमध्ये पर्यटनासाठी मोठी गर्दी पर्यटकांची होती, मात्र रविवारी (दि.२६) परतीच्या मार्गाने निघालेल्या पर्यटकांच्या वाहनांच्या गर्दीने रेवदंडा पारनाका येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली.



मुरूड तालुका पर्यटन क्षेत्र म्हणून प्रसिद्धीस आल्याने तेथे पर्यटकांची मोठी गर्दी नित्याचीच आहे. सुट्टीच्या दिवशी पर्यटक तेथे मोठी गर्दी करतात, मात्र या गर्दीचा भार अलिबाग ते मुरूड रस्त्याला सहन करावा लागत आहे. मुरूडकडे जात असलेली पर्यटकांची बहुतांश वाहने जा-ये करण्यासाठी रेवदंडा बाजारपेठेतील मुख्य रस्त्याचा वापर करतात.

रेवदंडा बाजारपेठेतील रस्ता अगोदरच अरूंद असल्याने तेथून दोन वाहने जाताना वाहनचालकांची तारांबळ उडते. परिणामी वाहतूक कोंडी होते.

रविवारी पर्यटक परतीच्या प्रवासाला निघाल्याने मोठ्या संख्येने वाहने रेवदंडा मुख्य रस्त्याने निघाली होती. त्यामुळे सायकांळी पारनाक्यावर वाहतूक कोंडी निर्माण झाली. सुट्टीच्या दिवशी पर्यटकांची वाहनांचा मार्ग रेवदंडा बायपासमार्गे करावा, जेणेकरून रेवदंडा बाजारपेठेत वाहतूक कोंडी होणार नाही, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ करीत आहेत.

# उरण फाटा येथे डंपरच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

घाटकोपर येथून तळोजा येथे जाणाऱ्या दुचाकीस्वाराला भरधाव डंपरने धडक दिल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. सायन-पनवेल मार्गावर उरण फाटा येथे शुक्रवारी सकाळी झालेल्या अपघातानंतर सीबीडी पोलिसांनी डपरचालकाला ताब्यात घेतले आहे.

घाटकोपर येथील भटवाडी परिसरात राहणारे अभिषेक मांजरेकर (वय ४२) दुचाकीवरून तळोजा येथे कामानिमित्त जात होते. सकाळी १०.३० वा. च्या सुमारास अभिषेक सायन-पनवेल मार्गावरील उरण फाटा ब्रिजच्या उतारावर पुणे मार्गिकेवर पाठीमागून आलेल्या डम्परने त्याला धडक दिली.

या अपघातात गंभीर जखमी अभिषेकला तातडीने कामोठे येथील एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते, मात्र उपचारांदरम्यान त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी सीबीडी पोलिसांनी डंपरचालक आरिफ शेख (वय २८) याला ताब्यात घेतले आहे. अपघातानंतर पुणे मार्गिकेवर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती.

# कौस्तुभ पाटीलची फ्लाईंग ऑफिसर रँकसाठी निवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील कौस्तुभ मेहुल पाटील याने राष्ट्रीय संरक्षण प्रबोधीनीचे (एनडीए) तीन वर्षांचे प्रशिक्षण पूर्ण केले. फ्लाईंग ऑफिसर रँकसाठी त्याची निवड झाली आहे. कौस्तुभ पुढील एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी इंडियन एअरफोर्स अॅकेडमी हैदराबाद येथे जाणार आहे.



कौस्तुभ पाटील अलिबाग येथील आहे. त्याचे प्रथमिक शिक्षण आयईएस स्कूल वरसोली येथे झाले. सातवीपर्यंतचे शिक्षण आरसीएफ स्कूल येथे झाले. आठवीला तो जिंदाल विद्यामंदिर साळाव येथे गेला. त्यानंतर नववी ते १२पर्यंतचे शिक्षण सैनिक स्कून कझुकुट्टम, केरळ यथे झाले. दहावीच्या परीक्षेत ५००पैकी ४९४ गुण मिळवून कौस्तुभने देशातील २७ शासकीय सैनिकी शाळांमध्ये प्रथम येण्याचा मान मिळवला होता. १२वीच्या परीक्षेत कौस्तुभने ९८ टक्के गुण मिळवले होते. त्यानंतर कौस्तुभने यूपीएससी परीक्षा पाहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण होऊन पुणे येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत (एनडीए) प्रवेश मिळवला.

एनडीएमध्ये त्याने इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेटमध्ये पदवीसाठी प्रवेश मिळवला. तीन वर्षांचा अभ्यासक्रम त्याने पूर्ण केला. पदवी पूर्ण करण्यासाठी पुढील एक वर्षांच्या प्रशिक्षणासाठी कौस्तुभ पाटील इंडियन एअरफोर्स अॅकेडमी हैदराबाद येथे जाणार आहे.

कौस्तुभचे वडिल मेहुल पाटील हे अलिबाग येथे श्री साई मोटार ट्रेनिंग स्कूल चालवतात. कौस्तुभचे आजोबा वामन पाटील हे ज्येष्ठ छायाचित्रकार आहेत. आजी माधवी पाटील शिक्षण विभागत केंद्रप्रमुख होत्या. कौस्तुभचे वडिल मेहुल पाटील महाविद्यलयीन शिक्षण घेत असताना राष्ट्रीय छात्र सेनेत होते. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत प्रवेश मिळविण्यासाठी मी स्वतः चार वेळा प्रयत्न केले मला ते अयशस्वी ठरले, परंतु माझा मुलगा कौस्तुभ याने पहिल्याच प्रयत्नात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रवेश मिळवला याचा मला अभिमान आहे, असे कौस्तुभचे वडिल मेहुल पाटील यांनी सांगितले.

# रोह्यामध्ये नऊ इमारती धोकादायक

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषदेच्या हद्दीतील नऊ इमारती धोकादायक आहेत. या इमारतींना पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नगर परिषदेच्या वतीने नोटीस बजावण्यात आली आहे.

पावसाळ्यात धोकादायक इमारती अथवा मोडकळीस आलेल्या इमारती पडण्याची शक्यता असते. त्यामुळे शहरातील या इमारती सुरक्षाच्या दृष्टीने रिकाम्या केल्या जातात. पावसाळा नजीक आला असून पावसाळ्यापूर्वी खबरदारीच्या उपाययोजना शहरासह ग्रामीण भागात करण्यात येत आहे. त्यामुळेच नगर परिषदेच्या हद्दीत धोकादायक इमारतीचे पाहणी करण्यात आले असून नऊ इमारती धोकादायक अवस्थेत आढळल्या आहेत.

या धोकादायक इमारतींना रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. त्यामुळे रहिवाशींनी डागडुजी अथवा स्ट्रक्चरल ऑडिट करून त्याचा रिपोर्ट सादर करावयाचा आहे.

# नागोठण्यातील विविध शाळांचा १०० टक्के निकाल

**नागोठणे : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर झाला. या परीक्षेत नागोठण्यातील विविध शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

नीव सोशल अॅड एज्युकेशन ट्रस्टच्या होली एंजल स्कूलमध्ये लावण्या शेजवाळ ९५.२० टक्के प्रथम, राहिया जावेद अधिकारी ९१.२० टक्के द्वितीय व सृष्टी विलास शिरसे ९०.८० टक्के तिसरा क्रमांक मिळवून उत्तीर्ण झाल्या आहेत. रिलायन्स फाउंडेशन स्कूल मराठी माध्यमाच्या शाळेतील प्रथमेश वाव्हळ ९० टक्के प्रथम, आर्या घासे ८२ टक्के द्वितीय व पूर्वा कुथे ७८.२० टक्के हिने तृतीय क्रमांक पटकाविला.

रोहा तालुक्यातील नागोठणे एज्युकेशन सोसायटीच्या उर्दू हायस्कूलमध्ये उमामा सिंधी ८९.८० टक्के प्रथम, सुफिया सिलोस्कर ८०.६० टक्के द्वितीय व अफ्रिन शेख ७९.४० टक्के मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला आहे. भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या एस. डी. परमार इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनियर कॉलेजमध्ये अंकुश यादव ८९.६० टक्के प्रथम, संस्कृती नावले ८७.४० टक्के द्वितीय व तृतीय प्रतिभा सुशांत मोहंती ८४.४० टक्के यांनी मिळविला.

# कर्जतमध्ये यंत्राच्या सहाय्याने भातकापणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात अवकाळी पावसाने भाताच्या शेतीचे नुकसान झाले आहे. भाताच्या पिकाचे आणखी नुकसान होऊ नये, यासाठी गौरकामत भागातील शेतकऱ्यांनी यंत्राच्या साहाय्याने भाताची कापणी केली. या भागातील ३५ एकर जमिनीवरील भाताची कापणी करण्यात आली.



तालुक्यात मोठ्या प्रमाणात दुबार भाताची शेती केली जाते. या वर्षी अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. त्यात गारपीट झाल्याने भाताच्या शेतात पाणीच पाणी काही दिवस साचून राहिले होते. त्यामुळे भाताची कापणी करून भाताचे पीक सुखरूपपणे गावात नेण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग सुरू होती. त्या वेळी या सर्व शेतकऱ्यांच्या मागे निल इनपुट या संस्थेच्या माध्यमातून कम्बाईन हार्वेस्टरचे सहाय्यतेसाठी भाताची कापणी करण्यासाठी मदत केली. निल इनपुटचे नैनेश दळवी यांनी गावातील प्रशांत जोशी, सुनील भागवत, अनिल देशमुख, प्रसाद जोशी, मोहन राणे यांच्या ३५ एकरातील भाताची यंत्राच्या साहाय्याने कापणी केली. त्यामुळे भाताची कापणी करण्यासाठी या शेतकऱ्यांना मजूर घ्यावे लागले नाहीत.

या कापणीच्या वेळी कृषी विभागाचे उपविभागीय अधिकारी नितीन फुलसुंदर, तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड तसेच मंडळ कृषी अधिकारी दिनेश कोळी आदी उपस्थित होते.

पान १ वरून

# पनवेल मनपाकडून मालमत्ता कराची गणना करून सुधारित देयके तयार

याबाबत पनवेल महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक प्रशांत रसाळ यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मालमत्ता कराची गणना करून सुधारित देयके तयार करण्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण झाले असून २६ मेपासून ती नागरिकांसाठी महापालिकेच्या ऑनलाईन पोर्टलवर (संकेतस्थळ) तसेच मोबाईल अॅपवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. सुधारित देयकामध्ये १ ऑक्टोबर २०१६ ते सन २०२०-२१पर्यंतचा कालावधी भाग अ ने दर्शविला असून सन २०२१-२२ ते २०२३-२४पर्यंतचा कालावधी भाग ब आणि सन २०२४-२५चा कालावधी भाग क ने दर्शविला आहे.

सुधारित बिलाचे प्रिंटिंग व वाटप प्रक्रिया सुरू असून नागरिकांनी विलंब न करता ऑनलाइन पोर्टल (संकेतस्थळ), अॅप अथवा थेट महापालिका कार्यालयास भेट देऊन २९ मेपूर्वी कर भरणा करण्याचे आवाहन आयुक्त रसाळ यांनी केले. या निर्णयामुळे सुधारित देयके पुन्हा तयार करावी लागल्याने सन २०२४-२५च्या चालू कर मागणीवर ३१ मेअखेर देण्यात आलेली पाच टक्के इतकी सूट येत्या ३० जूनपर्यंत वाढविण्यात आलेली असून नागरिकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन आयुक्त रसाळ यांनी केले आहे.

याशिवाय मालमत्ता कराचा भरणा ऑनलाईन केल्यास एकूण दोन टक्के इतकी सुट दिली जात असल्याने नागरिकांनी त्वरित कर भरणा करण्याचे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात आले. या निर्णयाच्या अनुषंगाने सुधारित देयके तयार करण्याचे विशेष काम मालमत्ता कर उपायुक्त मारुती गायकवाड व सहायक आयुक्त स्वरूप खारगे यांनी पार पाडले.


# सुधागड तालुक्यातील प्राचीन लेण्यांकडे दुर्लक्ष

## उपद्रवी लोकांकडून होतेय विद्रुपीकरण

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यासह जिल्ह्यातील विविध भागात प्राचीन व बहुमूल्य लेण्यांचे समूह आढळतात. सुधागडात ठाणाळे, नेणवली, गोमाशी व चांभार लेणी अशा भव्य लेणींचा समूह आहे. देशविदेशातील अभ्यासक व पर्यटकांचे आकर्षण ठरत आहेत. मागील वर्षी येथील लेण्यांमध्ये अमेरिकेतील भन्ते वेन सुका ध्यानधारणेसाठी आल्या होत्या, तर अनेक देशविदेशातील अभ्यासक दौरेदेखील करीत असतात. जगभरातील पर्यटकांना भावणाऱ्या या लेण्या, स्तूपचे जतन करण्याची गरज निर्माण झाली आहे.







तालुक्यात प्राचीन व भव्य लेण्यांचे समूह आढळतात. निसर्गाच्या कुशीत वसलेल्या या प्राचीन बौद्धकालीन लेण्या वैशिष्ट्यपूर्ण आहेत. येथील ठाणाळे, नेणवली, गोमाशी व चांभार लेणी अशा भव्य लेण्यांचा समूह आहे. प्राचीन व मौलिक इतिहासाची भरभक्कम साक्ष देणाऱ्या या वास्तू इतिहास अभ्यासक व देशविदेशातील पर्यटकांच्या पसंतीच्या ठरतात. या प्राचीन लेण्यांकडे पुरातत्व विभागाचे फारसे लक्ष नसल्याने त्यांची प्रचंड दूरवस्था झाली आहे. प्राचीन व मौलिक इतिहासाची साक्ष देणाऱ्या या वास्तू नामशेष होण्याची भीती व्यक्त आहे. दरम्यान उपद्रवी लोकांकडून रंगरंगोटी व विद्रुपीकरण करण्यात येत असल्याने नाराजी दिसून येते.

निसर्गाच्या कुशीत वसलेल्या या प्राचीन बौद्धकालीन लेण्यांची पुरती दूरवस्था झाली आहे. येथील स्तूप, विहार, चैत्यगृह, शिलालेख स्मारक यांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली असून त्यावर अनेक उपद्रवी लोकांनी ऑईल पेन्टने नावे लिहिली आहेत. त्यामुळे या ऐतिहासिक व इतिहासाची साक्ष देणाऱ्या या वास्तू नामषेश होण्याची भीती व्यक्त होत आहे.

# दहावीच्या परीक्षेत पनवेल, उरणमधील विद्यालयांचे घवघवीत यश

## रायगडात पनवेल तालुका अव्वल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षेचा निकाल सोमवारी (दि. २७) जाहीर झाला आहे. पनवेल तालुक्यात यंदा इयत्ता दहावीचा निकाल ९७.७६ टक्के लागला आहे. मागीलवर्षी पनवेलचा दहावीचा निकाल ९६.५३ टक्के इतका लागला असून यावर्षी एका टक्क्याने वाढ झाली आहे. रायगड जिल्ह्यात पनवेल तालुका अव्वल आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत मार्च २०२४ मध्ये घेण्यात येणारी दहावीची लेखी परीक्षा १ मार्च ते २६ मार्च या कालावधीत पार पडली. पनवेल तालुक्यातून १२५२४ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यापैकी १२४९६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. यामध्ये ४१७२ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले. तर ४९७३ विद्यार्थी प्रथम श्रेणी, २५५८ विद्यार्थी द्वितीय श्रेणी गुण प्राप्त करून उत्तीर्ण झाले.

या परिक्षेत पनवेल तालुक्यातील ५१४ विद्यार्थी काठावर पास झाले आहेत.

परीक्षेला बसलेल्या एकूण १२४९६ विद्यार्थ्यांपैकी १२२१७ विद्यार्थी यंदा पास झाले आहेत व २७९ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत. त्यानुसार पनवेल तालुक्याचा दहावी परीक्षेचा एकूण निकाल ९७.७६ टक्के इतका लागला आहे. १२वीचा निकाल लागल्यावर १०वीचा निकाल कधी लागणार याबाबत विद्यार्थी, पालकांसह अनेकांना प्रतीक्षा होती. अखेर सोमवारी दहावीचा निकाल लागला असून पनवेलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

## उरण तालुक्यातून २४१९ विद्यार्थी उत्तीर्ण

**उरण : प्रतिनिधी**

राज्यातील माध्यमिक विद्यालयाच्या मार्च २०२३चा इयत्ता दहावीचा निकाल शिक्षण मंडळाने सोमवारी घोषित करण्यात आला. या निकालात उरण तालुक्यातील दोन हजार ४१९ विद्यार्थी परीक्षेत बसले होते. त्यापैकी दोन हजार ३९६ विद्यार्थी-विद्यार्थिनी उत्तीर्ण झाले आहेत. ही टक्केवारी ९६.५६ टक्के इतकी आहे. खास करून यावर्षी उत्तीर्ण झालेल्या मुलींची संख्या मोठी आहे. त्यामुळे यंदाही दहावीच्या परिक्षेत मुलींचाच वरचष्मा असल्याचे सिद्ध झाले आहे.

उरण तालुक्यात एकूण २६ माध्यमिक विद्यालय आहेत. यातील ११ विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला आहे. यावर्षीच्या निकालात जे.ए.ई.एन.आय हायस्कूल उरण ८६.८७ टक्के, उरण एज्युकेशन सोसायटी १०० टक्के, तुकाराम हरी वाजेकर ९७.४३ टक्के, छत्रपती शिवाजी हायस्कुल (दि.बा. पाटील) विद्यालय जासई ९७.४३ टक्के, कोकण एज्युकेशन सोसायटी चिरनेर १०० टक्के, कर्मवीर भाऊराव पाटील, पिरकोन ८७.३४ टक्के, सिटीझन हायस्कूल, उरण ९८.५० टक्के, सेंट मेरीज स्कुल उरण १०० टक्के, रामचंद्र म्हात्रे विद्यालय आवरे ८९.९० टक्के, महात्मा गांधी दिघोडे, ९६.१५ टक्के, वीर सावरकर नवीन शेवे १०० टक्के, पी सी पाटील चाणजे ८१.२५ टक्के तर रोटरी स्कुल, उरण १०० टक्के, भागूबाई चांगू ठाकूर द्रोणागिरी १०० टक्के लागला आहे.

पदाजी मुंबईकर-वेश्वि- १०० टक्के, ई क्रा स्कुल, उरण १०० टक्के,पुंडलिक रामा पाटील, पाणदिवे-१०० टक्के, प्रभाकर पाटील विद्यालय, भेंडखळ ७२.७२ टक्के, सेंट मेरीज स्कुल-जेएनपीटी १०० टक्के, प्रभाकर पाटील, मोठीजुई ९६.७७, जेएनपी विद्यालय ९९.२२, द्रोणागिरी हायस्कुल, करंजा १०० टक्के, इंग्लिश स्कुल ७७.५० टक्के, छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय ८१.४८ टक्के, न्यू इंग्लिश स्कुल मोरा ९८.५० टक्के निकाल लागला आहे.

उरण तालुक्यातील निकालाची माहिती उरण पंचायत समितीच्या गटशिक्षण अधिकारी प्रियांका पाटील यांनी दिली असून तालुक्यातील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचे कौतुकही त्यांनी केले आहे.

## सीकेटी इंग्रजी माध्यम विद्यालयाने १०० टक्के गुणांसह जपली उज्वल यशाची परंपरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इयत्ता दहावीचा २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाचा निकाल सोमवारी (दि. २७) जाहीर करण्यात आला. यामध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमाने या वेळीही १०० टक्के प्राप्त करून घवघवीत संपादन केले आहे.


श्रावणी थळे
९८.८० %


पूजा नामे
९६.०० %


सृष्टी पाटील
९५.४० %

या वर्षी एकूण २०२ विद्यार्थी दहावी बोर्ड परिक्षेस प्रविष्ट झाले होते. एकूण २०२ विद्यार्थी उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले. यामध्ये विशेष योग्यता विद्यार्थी संख्या १०७, प्रथम श्रेणी विद्यार्थी संख्या ८१, द्वितीय श्रेणी विद्यार्थी संख्या १३, उत्तीर्ण श्रेणी विद्यार्थी संख्या १ अशी आहे. यात प्रथम क्रमांक श्रावणी अमर थळे ९८.८० टक्के, द्वितीय क्रमांक पुजा मिलिंद नामे ९६.०० टक्के, तृतीय क्रमांक सृष्टी सुरेश पाटील ९५.४० टक्के यांनी मिळविला आहे.

दहावीच्या अभ्यासाचे योग्य नियोजन बोर्डाच्या परिक्षेकरिता घेण्यात येणाऱ्या सराव परीक्षा तसेच शिक्षकांचे सुयोग्य मार्गदर्शन यामुळेच या शाळेतील विद्यार्थी दिवसेंदिवस अधिकाधिक गुण प्राप्त करून विद्यालयाचा नावलौकिक वाढवत आहेत, असे अनेक पाालकांनी सांगितले. या विद्यालयात शिकल्याचा आम्हाला अभिमान वाटतो, असे विद्यार्थ्यांयांनी नमूद केले.

सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले.

## 'सीकेटी' मराठी माध्यमाचाही १०० टक्के निकाल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या मराठी माध्यमाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे.


दिपश्री न्हावकर
९४.६० %


वैष्णवी शिंदे
९३.८० %


रोहन लांबोर
९३.४० %

दहावीच्या परिक्षेसाठी विद्यालयातून १३७ विद्यार्थी बसले होते. यामध्ये ६९ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य, ५५ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, १३ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी प्राप्त केली आहे. यामध्ये प्रथम क्रमांक दीपश्री दीपक न्हावकर हिने ९४.६० टक्के प्राप्त करून मिळविला आहे. द्वितीय क्रमांक वैष्णवी नितीन शिंदे हिने ९३.८० टक्के प्राप्त करून मिळविला आहे तर तृतीय क्रमांक रोहन विठ्ठल लांबोर यांने ९३.४० टक्के प्राप्त करून मिळविला आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, तसेच संस्थेचे कार्यकारिणी मंडळाचे सर्व सदस्य, विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

दरम्यान, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले आहे.

## एमएनएम आणि टीएनजीचा निकाल ९७.१४ टक्के

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाकडून घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय आणि तुकाराम नारायण घरत ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्सने विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे. शाळेचा निकाल हा ९७.१४ टक्के लागला असून १७५ पैकी १७० विद्यार्थी दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहे.


रजत शिरसाट
९५.६० %


पियुशा म्हात्रे
९२.२० %


साहिबा अन्सारी
९२.०० %

अनेक दिवसांपासून प्रतिक्षेत असलेल्या दहावी परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर झाला. या परीक्षेत १७५ विद्यार्थी बसले असून १७० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये ३५ विद्यार्थ्यांना ७५ टक्क्यांपेक्षा जास्त, ८२ विद्यार्थी ग्रेड १, ४५ विद्यार्थी ग्रेड २ आणि ८ विद्यार्थी पासींग कॉटेगरीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातून ९५.६० टक्के गुण मिळवून रजत रवींद्र शिरसाट प्रथम, ९२.२० टक्के मिळवत पियुशा कैलास म्हात्रे द्वितीय तर ९२ टक्के गुण प्राप्त करून साहीबा राणी मोहम्मद मकसुद अन्सारी ही विद्यार्थिनी तृतीय आली आहे.

शाळेच्या उत्तुंग यशाबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, विद्यालयाचे चेअरमन भार्गव ठाकूर, पर्यवेक्षक अरुण जोशी यांच्यासह शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या आहेत.

## गव्हाण विद्यालयाचा निकाल ९९.५४ टक्के

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजचा दहावीचा निकाल ९९.५४ टक्के एवढा लागला आहे. तर गुरुकुल आणि सेमी इंग्रजी विभागाचा निकाल १०० टक्के लागला आहे.


रिद्धेश नाईक
९०.२० %


आर्या पाटील
८९.४० %


शिवांजली खरात
८९.२० %


भार्गवी तेली
८९.२० %

विद्यालयामधील एकूण २१८ विद्यार्थी बोर्ड परीक्षेस प्रविष्ट झाले. त्यापैकी २१७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यामध्ये प्रथम रिद्धेश कांतीलाल नाईक ९०.२० टक्के, द्वितीय आर्या शेखर पाटील ८९.४० टक्के, तृतीय शिवांजली सचिन खरात व भार्गवी विनय तेली ८९.२० टक्के यांनी प्राप्त केला आहे. विद्यालयाच्या उज्वल यशाची परंपरा कायम राखणाऱ्या या सर्व विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत, संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी.देशमुख, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी, विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, उपप्राचार्य प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, विद्यालयाच्या ज्युनिअर कॉलेज विभागाचे प्रमुख बाबुलाल पाटोळे व पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

विद्यालयातील इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक चित्रलेखा पाटील, सागर रंधवे व संदीप भोईर यांचेसह सर्व विषय शिक्षक व त्यांना मार्गदर्शन करणारे विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे व उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले यांचेही सर्वत्र कौतुक आणि अभिनंदन होत आहे.

## ठकुबाई खारपाटील विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या ठकुबाई परशुराम खारपाटील इंग्रजी माध्यम स्कूलच्या दहावी माध्यमिक शाळेचा शेकडा निकाल १०० टक्के इतका लागला आहे.







दहावी शालांत परीक्षेसाठी या विद्यालयातून एकूण ३८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. ३८ विद्यार्थ्यांपैकी ३८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यामुळे या इंग्रजी माध्यम स्कूलचा शेकडा निकाल शंभर टक्के इतका लागला आहे. यात तेजस गणेश गव्हाणकर ८७ टक्के मिळवून ठकूबाई परशुराम खारपाटील इंग्रजी माध्यमाच्या विद्यालयात पहिला आला. रोहित हरेश भोईर ८६ टक्के मिळवून विद्यालयात दुसरा आला. प्रथमेश मधुकर फोफेरकर ८३ टक्के मिळवून तृतीय आला. अदिती भारत पाटील ८१. २० टक्के मिळवून विद्यालयात चौथी आली. प्रिती दयाशंकर जैस्वाल ८०.२० टक्के मिळवून पाचवी आली.

## खारपाटील विद्यालयात मुलींची बाजी

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या परशुराम धाकू खारपाटील माध्यमिक शाळेचा निकाल ९७.२९ टक्के इतका लागला आहे. दहावीच्या निकालात दरवर्षीप्रमाणे यंदाही मुलींनीच बाजी मारली आहे.

दहावी शालांत परीक्षेसाठी एकूण ७४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ७२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यात मृणाली मनोज म्हात्रे हिने ४२९ गुण मिळवून, ती ८३.८० टक्क्यांनी परशुराम धाकू खारपाटील माध्यमिक विद्यालयात पहिली आली. विघ्नेश विशाल पाटील याने ४१४ गुण मिळवून ८२.८० टक्क्यांनी तो विद्यालयात दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला. सिद्धी सुरेश गावंड आणि दिशा गणेश चिर्लेकर या दोघींनी ४०३ गुण मिळवून ८०.६० टक्क्यांनी विद्यालयात त्या तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या आहेत. पूर्वा शशिकांत ठाकूर हिने ३९६ गुण मिळवून ती ७९.२० टक्क्यांनी विद्यालयात चौथी आली. दिया दिनेश म्हात्रे हिने ३९२ गुण मिळवून ती ७८. ४० टक्क्यांनी विद्यालयात पाचवी आली.

## पनवेलच्या व्ही.के. हायस्कूलमध्ये आरोग्य शिबिर

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

एबीएन टेक्नॉलॉजी, महामना मालवीय मिशन मुंबई आणि इंटरनॅशनल वैश्य फेडरेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महाआरोग्य शिबिराचे आयोजन शनिवारी (दि. २५) पनवेलच्या व्ही. के. हायस्कूलमध्ये करण्यात आले. वैश्य वाणी समाज आणि इतरांसाठी पहिल्यांदाच पनवेलमध्ये शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात जवळपास एक हजार जणांनी लाभ घेतला. या वेळी माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, डॉ. अनिल भगत उपस्थित होते.




पनवेल, ग्रामीण, कळंबोली, खोपोली, खालापूर, पेण, चौक, कर्जत येथून नागरिक शिबिरासाठी आले होते. डॉ. अजय नकाशे, डॉ. श्रद्धा नकाशे, डॉ. निलेश चांडक, टाटा हॉस्पिटल, आर झुनझुनवाला, एच व्ही देसाई आय हॉस्पिटल, सद्गुरू कृपा लॅब आदींनी मेहनत घेऊन शिबिरातील नागरिकांना मोफत सेवा दिली. शिबिरात मोफत कर्करोग चिकित्सा व उपचार, नेत्र तपासणी, चष्मे वाटप, इसीजी, मधुमेह, रक्तदाब, स्त्रीरोग आदींची तपासणी करण्यात आली. विशेष करून कर्करोग होऊ नये यासाठी काय काळजी घ्यावी याचे मार्गदर्शन तज्ञांकडून करण्यात आले. या शिबिरात कर्करोगाबद्दल जनजागृतीदेखील करण्यात आली.

इंटरनॅशनल वैश्य फेडरेशन रायगड, वैश्य सभा मुंबई, पनवेल तालुका वैश्य समाज, वैश्य वाणी-एक हात मदतीचा, पनवेल महिला मंडळ यांनी या महाआरोग्य शिबिरासाठी आयोजक म्हणून काम पाहिले. हे महाआरोग्य शिबिर यशस्वी होण्यासाठी सर्वांनीच मेहनत घेतली.

## मालधक्का येथील नाल्याची साफसफाई

### अॅड. वृषाली वाघमारे यांचा पाठपुरावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका अॅड. वृषाली वाघमारे यांच्या पाठपुराव्यामुळे मालधक्का येथील नाल्याची साफसफाई महापालिकेच्या वतीने करण्यात आली आहे.



हवामान खात्याच्या अंदाजानुसार लवकरच पावसाला सुरुवात होणार आहे. या पार्श्वभुमीवर पनवेल महपालिका हद्दीमध्ये मान्सूनपूर्वीची कामे सुरू आहेत. याअंतर्गत माजी नगरसेविका अॅड. वृषाली वाघमारे यांनी मालधक्का येथील नाल्याची साफसफाई करण्यासंदर्भात पाठपुरावा केला होता. त्यानुसार जेसीबीच्या सहाय्याने या नाल्याची साफसफाई करण्यास सुरुवात झाली आहे.

याबद्दल परिसरातील नागरीकांनी त्यांचे आभार मानले आहेत. या वेळी भाजपचे शक्तीकेंद्र प्रमुख अॅड. जितेंद्र वाघमारे, महापालिकेचे आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, अनिकेत जाधव, अशो आंबेकर, जरीना शेख, नंदा टापरे, रवींद्र पास्ते या वेळी उपस्थित होते.

## संपादकीय

# दुर्घटनासे देर भली

एखादी भयंकर दुर्घटना घडून गेल्यानंतरच यंत्रणांनी खडबडून जागे व्हायचे आणि मग सर्वसंबंधितांवर कारवाया करीत सुटायचे, हे आता आपल्या अंगवळणी पडून गेले आहे, परंतु यामुळे हकनाक गेलेले जीव परत येत नाहीत. ज्या बेमुर्वतखोरपणामुळे अशा दुर्घटना घडलेल्या असतात, त्यांच्यावर नंतर नियम–कायद्यावर बोट ठेवून कारवाई केली जाते, पण मग अल्प काळातच सारे विस्मरणात जाते. पुन्हा तशीच दुर्घटना घडेपर्यंत...

**गेल्या काही दिवसांत देशाच्या निरनिराळ्या भागांत दुर्घटनांची मालिकाच घडताना दिसली आहे. मुंबईत होर्डिंग कोसळून अनेक जणांना जीव गमवावा लागला. उजनी जलाशयात बोट उलटून पाच जण बुडाल्याची घटना ताजी असतानाच प्रवरा नदीत बुडालेल्या एकाला शोधणाऱ्या एसडीआरएफ पथकाचीच बोट उलटली व त्यातील तीन जणांना जलसमाधी मिळाली. या घटनांपाठोपाठच गुजरातमध्ये राजकोट येथे गेमिंग झोनमध्ये आग लागून किमान २७ जण दगावल्याचे वृत्त आले. राजकोटची आग पुरती शमण्याच्या आधीच राजधानी दिल्लीतील एका नवजात बालकांच्या इस्पितळात आग लागून सात नवजात अर्भकांचा मृत्यू झाला. या दुर्घटना वेगवेगळ्या ठिकाणी घडल्या आहेत, पण त्यात एक समान सूत्र दिसून येते. ते आहे निष्काळजीपणाचे. नियम आणि कायदे धाब्यावर बसवून बेधडक आपला व्यवसाय चालवण्याची वृत्ती अंतिमत: मुळावर येते. या सर्व दुर्घटनांमध्ये नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचारच झालेला नाही, हे अगदी सहज लक्षात येते. सुरक्षाव्यवस्था ही अनेक व्यावसायिकांना अनाठायी खर्चिक बाब वाटते. शिवाय सरकारी यंत्रणेतील काही महाभाग असल्या प्रवृत्तींना भ्रष्ट मार्गाने मदत करतात. त्यातूनच या बेदरकार लोकांचे फावते. दिल्लीतील नवजात बाळांच्या इस्पितळात तर आणीबाणीच्या काळात बाहेर पडण्याचा मार्गदेखील उपलब्ध नव्हता आणि त्या इस्पितळाचा ना हरकत परवाना मार्च महिन्यातच संपला होता. तरीही ते इस्पितळ चालू राहिले होते. राजकोटमधील गेमिंग झोनच्या दुर्घटनेमधूनही असलाच अनागोंदी कारभार उघडकीस आला आहे. या गेमिंग झोनमध्ये विविध खेळांसाठी लागणारे दोन हजार लिटर डिझेल व जवळपास दीड हजार लिटर पेट्रोल साठवून ठेवण्यात आले होते. शिवाय पत्र्याच्या तकलादू शेडच्या साह्याने या गेमिंग झोनचे छप्पर उभारण्यात आले होते. तेच नेमके दरवाजावर कोसळल्याने बाहेर जाण्याचा मार्ग बंद झाला. परिणामी बळींची संख्या वाढली. दुर्घटना घडून गेल्यानंतर सरकारी यंत्रणेने जागे होऊन बडोदा, सूरत आणि अहमदाबादेतील गेमिंग झोनची कडक तपासणी करण्याचे आदेश जारी केले, परंतु ही दक्षता प्रारंभीच घेतली असती तर ही दुर्घटनाच घडली नसती. सरकारी अधिकाऱ्यांशी असलेले साटेलोटे, नियमांना बगल देण्याची वृत्ती आणि एकंदरीतच निष्काळजीपणा यामुळे निरपराध नागरिक मात्र किंमत मोजतात. सरकारी यंत्रणेने दर्शवलेले नियम आणि कायदे कागदावरच राहतात. ते शब्दश: पाळायचे म्हटले तर निम्मे व्यावसायिक हतबल होतील. कमीत कमी गुंतवणूक करुन जास्तीत जास्त नफा काढण्याची त्यांची वृत्ती इथे घातक ठरते. 'दुर्घटनासे देर भली' असा सुविचार महामार्गांवर नेहमी दिसतो. हा सुविचार फक्त वाहतुकीपुरताच नसून एकंदरीत जीवनातही उपयोगाचा ठरतो. दुर्घटनेनंतर तपास यंत्रणा तपास करतात आणि अहवाल मांडतात. त्यानुसार सरकार मदत जाहीर करते. कालांतराने ती दुर्घटना विस्मरणात जाते आणि पुढील दुर्घटना घडेपर्यंत यंत्रणा सुस्त होतात. असे किती काळ चालणार? यावर कायमस्वरुपी उपाय म्हणजे कायद्याची अंमलबजावणी कठोरपणे करणे हाच आहे.**

# जीवन म्हणजे एक 'परतफेड'



कॉलेजला असताना म्हणजे कॉलेजच्या शेवटच्या दिवसांत मित्रांकडून एक स्लॅम बूक लिहून घेतले जायचे, ज्यात मैत्री म्हणजे काय? जीवन म्हणजे काय? असे अनेक प्रश्न असायचे. ज्याचे उत्तर आपल्या वयानुसार, ज्ञानानुसार, अनुभवानुसार दिले जायचे, पण त्यातला जीवन म्हणजे काय? हा जो प्रश्न होता त्याला आपले अनुभव कमी पडायचे. तरीसुद्धा अनुभव काहीही असो प्रत्येकाच्या हिशोबाने उत्तर दिले जायचे. ज्यात कोणी म्हणायचे 'जीवन म्हणजे जन्म व मरणाचा प्रवास', 'जीवन म्हणजे दोन घडींचा डाव', 'जीवन म्हणजे एक संघर्ष' वैगरे बरेच अर्थ ज्याच्या त्याच्या परीने काढले जायचे.

जीवनाची व्याख्या कळायला व ते समजायला प्रत्येकाला जगण्याचा विशिष टप्पा पार करावा लागतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने जीवन कळते. खरंतर जीवन म्हणजे एक 'परतफेड' होय, ज्यामध्ये जगताना प्रत्येकाला आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर परतफेड करावी लागते. कधी घ्यावे लागते, तर कधी द्यावे लागते. माणसे बदलतात, नाती बदलतात, पण 'परतफेड' कायम राहते. चला तर ती परतफेड काय आहे हे आपण समजून घेऊया...

भारतीय विवाह परंपरेत 'मूळ' देण्याची एक पद्धत आहे. कोणीतरी सुरुवातीला दुसऱ्याला मूळ देतो, मग त्याने आपल्याला मूळ दिले होते म्हणून हापण देतो. कधी कधी अशाच लग्नसमारंभात अनेक पाहुण्यांच्या घोळक्यात एखादा गटात न बसणारा पाहुणा दिसतो. याचा अर्थ अगोदर त्या गटात न बसणाऱ्याने या बसणाऱ्याला त्याच्या गटात कधीतरी बोलवलेले असते. ही झालेली रसमिसळ केवळ परतफेड करण्यासाठीच होती. आपल्याकडचे लोकं विनाकारण कोणाला चहा पाजत नाहीत किंवा विनाकारण कोणाला जेवायलाही नेत नाहीत. तसे करण्यासाठीही एक अट असते ती म्हणजे परतफेडीची. त्याने आपल्याला दिले होते म्हणून आपण पण देऊ. नाही काही दिले तर काहीच नाही द्यायचे. यामध्ये बरेच महाभाग असेही असतात. समोरच्याने कधी आपल्याला काय दिले होते? किती वेळा दिले होते? हे बरोबर ध्यानात ठेवतात आणि बरोबरीने परतफेडही करतात. कधीही स्वतः कडून जास्त जाऊ देत नाहीत. चुकून जर पुढच्याकडून अधिक प्राप्त झाले तर झाले. वाढदिवसाला शुभेच्छाही तोलून मापून दिल्या जातात. एवढेच काय तर वाढदिवसाच्या शुभेच्छांचे व्हॉट्सॲप स्टेटसही परतफेडीसाठीच ठेवतात. परतफेड करायची म्हणून करतात. गिफ्ट द्यायचे असेल तर त्याने दिले म्हणून द्यायचे, नाही दिले तर नाही द्यायचे. पुढच्याचे गिफ्ट ज्या किमतीचे होते त्याच किमतीचे द्यायचे. लग्नसमारंभातही हाच नियम पाळला जातो. त्यांचा आहेर भारीचा तर आपलाही! त्यांचा हलका तर आपणपण हलकाचा देऊ. मग आपली हैसियत काही का असेना.

आई–वडील मुलांना जन्म घालतात. त्यांना शिकवतात. स्वत:च्या पायावर उभे करून मोठे करतात, मग मुलांची वेळ असते आई–वडिलांना सांभाळायची. ही एक पूर्वापार चालत आलेली परतफेड होय, ज्याला आपण कर्तव्य म्हणतो. यामध्ये कधी कधी परतफेडीचे नियम बरोबर पाळले जातात. म्हणजे जी मुलं आपल्या आईवडिलांना सांभाळत नाहीत, त्यांची मुलं पुढे त्यांना सांभाळायला कर्तव्य समजत नाहीत, कारण ती जे पाहतात तशीच ती समजतात व वागतात.

एकमेकांना मदत करणे हादेखील एक परतफेडीचाच भाग आहे. संकटकाळी केलेली मदत आपण ध्यानात ठेवतो आणि पुढच्या व्यक्तीला वेळ आली तेव्हा आपण नक्कीच धावून जातो, कारण आपल्याला केलेली मदत आपण कधी विसरत नाही. ती विसरायचीही नसते. जो विसरतो तो कृतघ्नच असतो.

परतफेडीच्या बाबतीत लोकं जाणीवपूर्वक काही गोष्टी विसरतात. जसे ज्ञान घ्यावे तसे द्यावे, पण बरेच जण असे करताना दिसत नाहीत, कारण त्यांना आपल्यापेक्षा कोणीतरी सज्ञान व्हावे असे वाटत नाही. एखाद्याला एखादी गोष्ट कोणाच्या आधी समजली तर ती दुसऱ्यांना लवकर समजू नये म्हणून स्वतःकडून न कळविण्याची पुरेपूर काळजी घेतल्या जाते. म्हणजे ज्ञान देण्याला आपण परतफेड समजतच नाही. दुसरी आणखी एक महत्वाची बाब म्हणजे प्रत्येक वेळी ज्याने आपल्याला काहीतरी दिले तर परतफेड त्यालाच करावी? का? कधी आपण होऊन दुसऱ्याला मदत करून स्वतःपासून सुरुवात केलेली वाईट आहे का? कारण एखाद्याच्या परतफेडसाठी त्या वेळेची वाट पाहणे यापेक्षा ज्याला गरज आहे त्याला देणे महत्त्वाचे नाही का? परतफेड ही आत्मसंतुष्टीसाठी आपण करतो. ते एक प्रकारचे समाधान आहे. म्हणजे माझे आता कोणाला काही देणे नाही, पण हीच आत्मसंतुष्टी स्वतःपासून सुरुवात केली तरी चालू शकते. त्यासाठी आपल्यापैकीच कोणीतरी चांगल्या कामाची सुरुवात करावी लागेल आणि ती व्यक्ती आपण स्वतः होत असू तर चांगलेच. जर असे नाही केले तर परतफेड नावाची ही प्रक्रिया कशी सुरू होईल. प्रत्येक वेळी पुढच्याने जे दिले तितकीचे तोलूनमापून परतफेड करणे हे योग्य नाही. कधी जास्त तर कधी कमी होऊ शकते. त्या वेळची गरज काय हे महत्त्वाचे आहे. हा विचार दोन्हीकडच्या व्यक्तींनीही तितकाच विचार करून करायला हवा.

बऱ्याच वेळा आपल्याला जे दिलेले आहे ते असून दिसत नाही. याचा अर्थ आपण परतफेड करायची नाही असा होत नाही. जसे निसर्ग आपल्याला खूप काही देतो. मग या निसर्गाच्या निकोप वाढीसाठी आपण झाडे लावणे, प्रदूषण कमी करणे, पाण्याचा काटकसरीने वापर करणे ही परतफेड करायला काय हरकत आहे. ज्या गोष्टी अदृश्य असतात त्या नसतात असे नव्हे. तो शोध आपल्याला घेता आला पाहिजे आणि वेळ साधून परतफेडही करता आली पाहिजे.

नातेसंबंधात परतफेड खूप महत्त्वाची आहे. यामध्ये सुखावणे कमी दुखावणेच जास्त असते. दुखावण्यामागचे कारण इतकेच, की आपण समोरच्याकडून अपेक्षा जास्त ठेवतो आणि स्वतःची द्यायची वेळ आली की आपले कर्तव्य नाही किंवा आपण बांधील नाही म्हणून मागे हटतो. त्या वेळस आपण समोरच्याचा विचार एक माणूस म्हणून करायला हवा. नेहमी जावयाला सासरच्यांनी काही न काही द्यायचे आणि जावयाची द्यायची वेळ आली की आपण बांधील नाही म्हणून मागे सरायचे. हे काही बरोबर नाही. भावाने बहिणीचे रक्षण करायचे हे पूर्वापार आपण ऐकत आलोय. जी गोष्ट आपण मनेभावे पाळलीसुद्धा. यात रक्षण म्हणजे काय? तर केवळ शत्रूपासून संरक्षणच नव्हे तर बहिणीला भावनिक आधार, आर्थिक हातभार लावणे म्हणजे तिचे येणाऱ्या संकटापासून रक्षणच होय की! मग असाच आधार भावालापण लागत असेल, नाही का? ज्या बहिणी हक्काच्या बाता करतात त्यावेळेस भाऊ म्हणून त्याचादेखील बहिणीवर तितकाच अधिकार असायला हवा. जर ती मदत करण्यास स्वत:च सक्षम नसेल तर आपण ते समजू शकतो, पण सगळे व्यवस्थित असून वेळ आली तेव्हा तिचा आधार जर भावाला नसेल तर याला परतफेड नाही म्हणता येणार. नाती तेव्हाच टिकतील जेव्हा हा परतफेडीचा नियम पाळला जाईल. उगाच दुसऱ्यावर तोच नियम लादून नाही. एक मित्र भावापेक्षा जवळचा का वाटतो, कारण त्या मैत्रीमध्ये परतफेड पुरेपूर पूर्ण केल्या जाते. कधी चुकले तर समायोजनही साधले जाते.

निव्वळ खाणे–पिणे आणि दगदग म्हणून रोज पळणे केवळ यालाच जीवन नाही म्हणता येणार. या सर्व दुव्यांना जोडणारा दुवा ही खरी परतफेड असते. ज्याला हा दुवा कळतो आणि जो हा दुवा पक्का धागा म्हणून विणतो तोच खरे आयुष्य जगतो आणि इतरांना समजू शकतो. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे परतफेड म्हणजेच सर्व नाही, पण सर्व नसली तरी ती जीवनाचा अविभाज्य भाग नक्कीच आहे, ज्याला आपण टाळू शकत नाही.

**–अमोल भारती, नांदेड**

## बदलते तंत्रज्ञान

## इअरबड्सचा अतिवापर इन्फेक्शनला कारणीभूत

म्युझिक ऐकण्यासाठी वायरलेस इयरबड्स आपल्या कानात पटकन घालणे आणि ते दीर्घकाळ वापरणे हा आता एक नवीन ट्रेंड बनला आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे ३.५mm हेडफोन जॅक आता बहुतेक नवीन स्मार्टफोनमध्ये उपलब्ध नाही, यामुळे ब्लूटूथ वेअरेबल्स हा एक चांगला पर्याय आहे. मात्र, त्यांचा जास्त वापर आणि निष्काळजीपणामुळे कानाला इन्फेक्शन होऊ शकते. इअरबड्स जास्त काळ वापरण्याचे कोणते धोके आहेत आणि ते कसे टाळता येतील याकडे एक नजर टाकूया.



जास्त काळासाठी इयरबड्स वापरल्यामुळे या समस्या येऊ शकतात. बॅक्टेरिया आणि बुरशी: बॅक्टेरिया आणि बुरशी इअरबड्समध्ये जमा होऊ शकतात, ज्यामुळे कानापर्यंत पोहोचू शकते आणि इन्फेक्शन होऊ शकते.

इयर वॅक्स: इअरबड्स दीर्घकाळ घातल्यामुळे इयर वॅक्स जमा होऊ शकतो, ज्यामुळे ऐकण्याच्या समस्या आणि संसर्ग होऊ शकतो. त्वचेला जळजळ: काही लोकांना इयरबड्सच्या सतत वापरामुळे त्वचेवर जळजळ आणि ॲलर्जी होऊ शकते, ज्यामुळे कानात खाज सुटणे, लालसरपणा आणि सूज येऊ शकते. तुमच्या कानात वेदना, सूज किंवा खाज येत असेल किंवा कानातून रक्त स्त्राव होत असेल तर सावध व्हा. याशिवाय, तुम्हाला ऐकण्यास त्रास होत असला तरीही, इअरबड्सच्या वापराबाबत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. अशा प्रकारे तुम्ही स्वतःला इन्फेक्शनपासून सुरक्षित ठेवू शकता. जर तुम्हाला अशा इन्फेक्शनच्या धोक्यापासून स्वतःचा बचाव करायचा असल्यास काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. इअरबड्स तयार करणाऱ्या कंपनीने दिलेल्या सूचनांनुसार इअरबड्स स्वच्छ करणे आवश्यक आहे. अस्वच्छ इअरबड्स अशा इन्फेक्शनचे प्रमुख कारण बनू शकतात. आधी तुमचे कान चांगले कोरडे करा आणि त्यानंतरच इअरबड्स वापरा. कानात ओलावा असताना इअरबड्स वापरल्यास इन्फेक्शनचा धोका वाढतो. शक्य असल्यास जास्त वेळ इअरबड्स वापरू नका. तुम्हाला कोणत्याही प्रकारची समस्या वाटत असल्यास, इअरबड वापरणे थांबवा किंवा ते बदला. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही एकापेक्षा जास्त इअरबड वापरू शकता. ते स्टोअर करण्याची जागादेखील चांगली हवी. जर इअरबड्स बराच काळ वापरायचे नसतील तर ते नीट स्वच्छ ठेवा.

# स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर



### निमित्त

विनायक दामोदर सावरकर अर्थात वीर सावरकर यांचा आज जन्मदिन. विनायक दामोदर सावरकर हे खऱ्या अर्थाने बहुआयामी व्यक्तीमत्व होते. स्वातंत्र्यसैनिक, राजकारणी, समाजसुधारक, कवी व लेखक, हिंदू तत्त्वज्ञ ते भाषाशुद्धी व लिपिशुद्धी चळवळींचे प्रणेते अशा प्रत्येक क्षेत्रात सावरकरांचे योगदान अनन्यसाधारण आहे.

सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ रोजी नाशिक जिल्ह्यातील भगूर या गावी झाल्या. दामोदर सावरकर यांना तीन अपत्य होती. बाबाराव सावरकर हे थोरले, विनायक सावरकर हे मधले तर नारायणराव सावरकर हे धाकटे होते. सावरकरांचे प्राथमिक शिक्षण नाशिकच्या शिवाजी विद्यालयामध्ये झाले. ते लहानपणापासूनच अत्यंत बुद्धिमान होते. वक्तृत्व, काव्यरचना याच्यावर त्यांचे प्रभुत्व होते. जिव्हा आणि लेखणी ते सारख्याच ताकदीने चालवत. त्यांनी वयाच्या तेराव्या वर्षी लिहिलेला स्वदेशीचा फटका, स्वतंत्रतेचे स्तोत्र या रचना त्यांच्या प्रतिभेची साक्ष देतात.

राष्ट्रभक्तसमूह ही गुप्त संघटना सावरकरांनी पागे आणि म्हसकर या आपल्या साथीदारांच्या साहाय्याने स्थापन केली. मित्रमेळा ही संघटना या गुप्त संघटनेची प्रकट शाखा होती. पुढे संस्थेचा विस्तार वाढत गेला आणि तिचे रुपांतर अभिनव भारत संघटनेमध्ये झाले. सावरकरांनी पुण्यामध्ये इ.स. १९०५ साली विदेशी कापडांची होळी केली. त्यानंतर श्यामजी कृष्ण वर्मा यांनी ठेवलेली शिवाजी शिष्यवृत्ती मिळवून कायद्याच्या अभ्यासासाठी सावरकर लंडनला रवाना झाले. देशाच्या स्वातंत्र्याचा ध्यास घेतलेल्या सावरकरांनी तेथे देखील आपले कार्य सुरूच ठेवले. लंडनमधील इंडिया–हाऊसमध्ये राहात असताना सावरकरांनी जोसेफ मॅझिनीच्या आत्मचरित्राचे मराठी भाषांतर केले. या भाषांतराला जोडलेल्या प्रस्तावनेत सावकरांनी सशस्त्र क्रांतीचे तत्त्वज्ञान विषद केले होते. त्या काळातील अनेक युवकांना ही प्रस्तावना म्हणजे स्वातंत्र्याचा बीजमंत्र वाटत असे. त्याच काळात त्यांनी इतर देशांमधील क्रांतिकारक गटांशी संपर्क साधून, बॉम्ब तयार करण्याचे तंत्रज्ञान आत्मसात केले. ते तंत्रज्ञान व २२ ब्राऊनिंग पिस्तुले त्यांनी भारतात पाठवली. त्यापैकीच एका पिस्तुलाने नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याचा वध अनंत कान्हेरे या तरुणाने केला.

यानंतर सावरकरांना अटक करण्यात आली. अटक झाल्यानंतर त्यांची अंदमानाच्या काळकोठडीत रवानगी करण्यात आली. अंदमानातून सुटल्यानंतर सावरकरांना ब्रिटिशांनी रत्नागिरीत स्थानबद्ध केले. त्यानंतर हिंदू समाज एकजीव आणि संघटित करण्यासाठी सावरकरांनी रत्नागिरीत राहून कार्य केले. हिंदू समाजाच्या अध:पतनाला जातिव्यवस्था, चातुर्वर्ण्य व्यवस्था जबाबदार आहे. हे ओळखून त्यांनी जातिव्यवस्थेचा विरोध केला. आपल्या लेखनाने कोणी सनातनी दुखावेल याची चिंता न करता अंधश्रद्धा, जातिभेद यांवर त्यांनी कडाडून टीका केली. त्यांनी रत्नागिरीमधील आपल्या वास्तव्यामध्ये समाजसुधारणेसाठी अनेक कार्य केली. त्यांनी जावळपास ५०० मंदीरे अस्पृश्यांसाठी खुली केली. यावरूनच आपल्याला त्यांच्या कार्याचा आवाका लक्षात येतो.

अंदमानाहून सुटकेच्या आधीचे जीवन व सुटकेनंतरचे जीवन, असे वीर सावरकरांच्या जीवनाचे दोन मुख्य भाग पडतात. पहिल्या भागात आक्रमक, क्रांतिकारी सावरकर, क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान सावरकर, धगधगते लेखन करणारे सावरकर असे त्यांचे रूप दिसते. तर दुसऱ्या भागात समाजक्रांतिकारक सावरकर, हिंदू संघटक सावरकर, भाषाशुद्धी चळवळ चालवणारे व श्रेष्ठ साहित्यिक सावरकर, विज्ञाननिष्ठेचा प्रचार करणारे सावरक असे त्यांचे रुप दिसून येते. अशा या थोर क्रांतीकाराचा, साहित्यित्यिकाचा, हिंदू संघटकाचा मृत्यू २६ फेब्रुवारी १९६६ रोजी मुंबईत झाला. **(साभार : इंटरनेट)**

### क्लिक...क्लिक...!



**पनवेल : बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तीव्र होऊन पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवर चक्रीवादळ धडकले. त्यामुळे सर्वच ठिकाणी सोमवारी ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. तळोजा येथे दाटून आलेल्या ढगांचे तन्वी पवार यांनी काढलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

## हिमोग्लोबिन वाढण्यासाठी 'या' पदार्थांचे करा सेवन

शरीरात हिमोग्लोबिनच्या कमतरतेमुळे निमियाची समस्या उद्भवू शकते. चक्कर येणे, अशक्तपणा, भूक न लागणे ही शरीरातील हिमोग्लोबिनची पातळी कमी झाल्याची लक्षणे आहेत. हिमोग्लोबिन हे लाल रक्तपेशींमध्ये आढळणारे लोहयुक्त प्रथिन आहे, जे रक्ताला लाल रंग देते आणि शरीराच्या प्रत्येक भागात ऑक्सिजन पोहोचवण्याचे काम करते, पण मग शरीरात हिमोग्लोबिनची कमतरता झाल्यास काय करावे? कोणते पदार्थ खाल्ल्याने हिमोग्लोबिनची कमतरता भरून निघते? याची माहिती स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. अंजली कुमार यांनी दिली आहे.



**रक्त वाढवण्यासाठी आवश्यक पोषक घटक कोणते?**

आयर्न : शरीरातील अशक्तपणा दूर करण्यासाठी आहारात लोहयुक्त पदार्थांचा समावेश करायला हवा. हिमोग्लोबिनच्या निर्मितीमध्ये लोह महत्त्वाची भूमिका बजावते. लोह शरीरात लाल रक्तपेशी तयार करण्यास मदत करतात.

**व्हिटॅमिन बी १२ :** लाल रक्तपेशी, पांढऱ्या रक्तपेशी आणि प्लेटलेट्सच्या निर्मितीसाठी; व्हिटॅमिन बी१२ युक्त पदार्थांचा समावेश करणे गरजेचे आहे. कारण व्हिटॅमिन बी १२ हे पोषक तत्व शरीर तयार करू शकत नाही. त्यामुळे व्हिटॅमिन बी १२युक्त पदार्थांचे सेवन करायला हवे.

**फॉलिक ॲसिड :** शरीरातील हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढवण्यासाठी आहारात फॉलिक ॲसिड असलेल्या पदार्थांचा समावेश करायला हवा. कारण यामुळे शरीरात लाल रक्तपेशी निर्माण होण्यास मदत होईल, ज्यामुळे निमियाची समस्या दूर होऊ शकते.

**प्रोटीन :** प्रथिनेयुक्त पदार्थांचा आहारात समावेश केल्याने हिमोग्लोबिनची पातळी वाढण्यास मदत होते. मुख्य म्हणजे प्रोटीन रिच फुड्समध्ये फॅट्सचे प्रमाण कमी असल्याकारणाने आरोग्याला अनेक फायदे मिळतात.

**शरीरात हिमोग्लोबिन वाढवणारे शाकाहारी पदार्थ**

दिवसा भरपूर पाणी प्या पण रात्री झोपण्यापूर्वी नको, असे का? झोपण्यापूर्वी पाणी कुणी प्यावे, कुणी नाही? लोहयुक्त पदार्थ–पालक आणि सर्व हिरव्या पालेभाज्या, डाळी, चणे, टोफू, भोपळ्याच्या बिया, सफरचंद, केळी, खजूर. व्हिटॅमिन बी १२–यामध्ये आपण डेअरी उत्पादने, फोर्टिफाइड तृणधान्ये, चीजचा आहारात समाविष्ट करू शकता. फॉलिक सिड– हिरव्या पालेभाज्या, ब्रोकोली, लिंबूवर्गीय फळे, संपूर्ण धान्ये यांचे सेवन करा.

# एसएससी परीक्षेत मृदूल घाटे पोलादपुरात प्रथम



**पोलादपूर** : माध्यमिक आणि उच्च माध्यमिक एसएससी परिक्षेच्या निकालामध्ये तालुक्यातील १२ शाळांनी १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली तर यशवंत इंग्लिश मिडीयम स्कूलचा मृदूल अमित घाटे याने ९५.२० टक्के गुण मिळवित तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला.


न्यू इंग्लिश स्कूल, शंकरराव महाडिक इंग्लिश मिडियम स्कूल, यशवंत इंग्लिश मीडियम स्कूल, साने गुरुजी विद्यालय, श्रीराम विद्यालय, माऊली प्रशाला, कांगोरीगड माध्यमिक विद्यालय, नरवीर तानाजी मालुसरे माध्यमिक विद्यालय, नरवीर तानाजी शेलारमामा विद्यालय, स्व. शांताराम शंकर जाधव न्यू इंग्लिश स्कूल, माध्यमिक विद्यालय आणि हाजी अली आदम अनवारी हायस्कूल या शाळांचा यंदा १०० टक्के निकाल लागला आहे. त्यापाठोपाठ वरदायिनी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ९८.६३ टक्के, न्यू इंग्लिश स्कूल ९५.८३ टक्के, विद्यामंदिर ९४.१७ टक्के, माध्यमिक विद्यालय साखर ९०.९० टक्के, माध्यमिक विद्यालय गोळेगणी ७८.५७ टक्के आणि न्यू इंग्लिश स्कूल पैठण ५० टक्के असा निकाल लागला आहे.

यशवंत इंग्लिश मीडियम स्कूलचा मृदूल घाटे ९५.२० टक्के गुण मिळवित प्रशालेसह तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. वरद शेठ ८९.४० टक्के द्वितीय तर राज भालेकर ८७.२० याने तृतीय क्रमांक प्राप्त केला. रयत विद्यामंदिरचा प्रणव धायगुडे ९३.२० टक्के प्रथम, प्राची झोरे ९१.२० द्वितीय तर सई मने ८८ टक्के मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीण झाले. श्री शंकरराव गोपाळराव महाडिक इंग्लिश मीडियम शाळेचा ओम मोरे ९२ टक्के प्रथम, वेदांत गोळे ८२ टक्के द्वितीय तर श्रावणी महाडिक ८१.६० टक्के प्राप्त करून तृतीय क्रमांक पटकाविला.

साने गुरुजी विद्यालयाचा सार्थक उतेकर ९२ टक्के प्रथम, प्रीतीका उतेकर ९१.४० टक्के द्वितीय, अनिश शेलार ८४.४० टक्के गुण मिळवित तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. माध्यमिक विद्यालय सवादमधील आर्णा पाटेकर ८९.६० टक्के प्रथम, अमेय महाडकर ८७ टक्के आणि प्रगती वाटेकर ८६.६० टक्के मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. हाजी अली आदम अनवारी हायस्कूल वावे येथील सायमा तांबे ८४.४० टक्के प्रथम, अफरा करबेलकर ८० टक्के आणि इफत येलूकर ७३.६० टक्के या तीन विद्यार्थिनींनी उत्तम गुण मिळवित प्रशालेत अव्वल ठरल्या. वरदायिनी माध्यमिक विद्यालय कापडे बुद्रुक येथे कुणाल पिंजारी ९१.८० टक्के प्रथम, अक्षदा धर्माधिकारी ९१.४० टक्के द्वितीय, भरत ढवळे ९८.२० टक्के तृतीय, सृष्टी सलागरे ८८.६० टक्के चतुर्थ आणि आकाश सालेकर ९७ टक्के पाचव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

नरवीर तानाजी मालुसरे माध्यमिक विद्यालय देवळेमध्ये तेजस पवार ८५.८० टक्के गुण मिळवून प्रथम, करण केसरकर ८१.८० टक्के द्वितीय तर प्रतीक केसरकर ७७.२० टक्के मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. माध्यमिक विद्यालयाचा साखरमध्ये साक्षी गुडेकर ९० टक्के प्रथम, ओंकार मालुसरे ८९.८० टक्के द्वितीय तर साक्षी मोरे ८७ टक्के तृतीय क्रमांकाने अव्वल ठरले. श्रीराम विद्यालय लोहारे येथील श्रद्धा साळुंखे ९०.२० टक्के प्रथम, आयुष मोरे ८४.२० टक्के द्वितीय तर हंसिका साळवी ७५.४० टक्केने उत्तीर्ण झाले. तानाजी शेलारमामा प्रशाला उमरठ येथील तेजस्वी कळंबे ९१.८० टक्के प्रथम, ऋतुजा मोर ८९.२० टक्के द्वितीय, पल्लवी मोरे ८३.८० टक्के मिळवून तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले.

# एस.एस. निकम इंग्लिश स्कूलचा १०० टक्के निकाल





**माणगाव : प्रतिनिधी**

दहावी शालांत परीक्षेचा निकाल सोमवारी ऑनलाईन जाहीर झाला. या परीक्षेत माणगाव येथील एस. एस. निकम इंग्लिश स्कूलचा निकाल १०० टक्के इतका लागला.

अनुष्का जैन ९८.२० टक्के प्रथम, अनुष्का उभारे ९७.२० टक्के द्वितीय, सनप्रीतसिंग बर्मन ९६.६० टक्के तृतीय, श्रावणी गवळी ९६.४० टक्के चतुर्थ तर मंथन फराडे याने ९६.२० टक्के संपादन करून पाचवा क्रमांक पटकावला आहे.

दहावी परीक्षेसाठी एकूण ११९ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १०३ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य संपादन करून १३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर तीन विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे माणगाव एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. मदन निकम, एस. एस. निकम इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक, शाळेचे को-ऑर्डिनेटर, सर्व शिक्षकांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# राधिका विरकुड मुरूड तालुक्यात प्रथम



**मुरूड : प्रतिनिधी**

शहरातील सर एस.ए. हायस्कूलमधील विद्यार्थिनी राधिका प्रशांत विरकुड या विद्यार्थिनीने इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९९ टक्के मिळवून तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे, तसेच तिने रायगड जिल्ह्यातसुद्धा प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्यामुळे तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

हायस्कूलमधील द्वितीय कशिश राजभर ९३.६० टक्के, तृतीय अनुष्का दांडेकर ९२.६० टक्के, तुषार संजय करडे ८४ टक्के चतुर्थ क्रमांक पटकाला आहेत. या हायस्कूलचा निकाल सेमी इंग्रजी माध्यमचा १०० टक्के लागला आहे. इयत्ता दहावीसाठी १५० विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी १४३ उत्तीर्ण झाले आहेत.

# कर्जतमध्ये 'अभिनव'ची समृद्धी बोराडे प्रथम

**कर्जत : प्रतिनिधी**

एसएससी शालांत परीक्षेत अभिनव ज्ञानमंदिरची समृद्धी बोराडेने ९७ टक्के गुण मिळवून तालुक्यात प्रथम आली आहे, तर शारदा मंदिर विद्यालयाचा ओम जाधव ९५.८० टक्के दुसरा तर गीता घारे इंग्लिश मीडियम स्कूल येथील साईराम खत्रावत याने ९५.२० टक्के मिळवून तालुक्यात तिसरा आला आहे.

अभिनव ज्ञानमंदिमध्ये द्वितीय सार्थक लोखंडे ९४.४० टक्के, तृतीय शंतनु अरुण पाटील ९४.२० टक्के; शारदा मंदिरमध्ये द्वितीय केतकी श्रीखंडे ९३.६० टक्के, तृतीय सृष्टी पाटील ९३ टक्के; गीता घारे इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये द्वितीय नेत्रा शेळके ९०.२० टक्के, तृतीय भक्ती चोराघे ८८.८० टक्के; सेमी इंग्लिश मीडियम प्रथम हर्षदा जाधव ९१.२०, द्वितीय सानिया देशमुख ९०.८० टक्के, तृतीय भक्ती कदम ८८.४० टक्के; केईएस इंग्लिश मीडियम स्कूल प्रथम तनुश्री गुजराथी ९३.६० टक्के, द्वितीय प्रिया थोरवे ९३.४० टक्के, तृतीय गौरी बोराडे ९३.२० टक्के; नेरळ विद्यामंदिर प्रथम राज कदम ९१.६० टक्के, द्वितीय प्रथमेश म्हात्रे ८८.८० टक्के, तृतीय जयदीप घारगे (८७.६०); श्री गजानन विद्यालय प्रथम कुणाल भुंडरे ८८.८० टक्के, द्वितीय रोहिणी घारे ८८.६० टक्के, तृतीय प्रज्ञा बोडके ८५.६० टक्के; ज्ञान मकरंद विद्यालय प्रथम आयुष दीक्षित ६६.८० टक्के, द्वितीय सिद्धी घारे ६३.४० टक्के, तृतीय सागर देशमुख ६१.८० टक्के मिळविले.

## पनवेल महानगरपालिका
### ता, पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ | फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१ | आयुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com | वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र. पमपा/मातंवि/२४२४/प्र.क्र.०२/१६०९/२०२४ | दिनांक: २७/०५/२०२४

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | निविदा/पमपा/मातंवि/ २४२४/प्र.क्र.०२/ १६०९/२०२३-२४ | पनवेल महानगरपालिकेत इंटरनेट लीज लाईन (Internet lease line) १०० MBPS SME घेण्याबाबत. (३ वर्षाकरीता) अंदाजपत्र तयार करणेकरिता बाजारभाव मागवित आहेत. |

या निविदेबाबतची माहिती वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरबाबतची दरपत्रके दि.२८/०५/२०२४ ते दि.०६/०६/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभाग, पनवेल महानगरपालिका येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागात प्राप्त होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**उप आयुक्त (I)**
**पनवेल महानगरपालिका**

जावक क.: १२५९/२०२४ | दिनांक २७/५/२४

## जाहीर नोटीस

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ खाली दाखल दावा नोटीस महात्मा फुले को. ऑप. क्रे. सो. लि., पनवेल या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्ती विरूध्द थकीत कर्जाचा भरणा केला नसल्याने नमूद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली, तथापि खालील नमूद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणणे दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या जाहीर नोटीसीव्दारे आपणांस पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबत अंतिम सुनावणी दिनांक ०३/०६/२०२४ रोजी सकाळी ११:३० वाजता ठेवण्यात आली असुन सदर सुनावणीस आपण स्वतः वा आपले प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहवे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निर्णय दिला जाईल.

| अ. क्र. | दावा क्र. | प्रतिवादीचे नाव | पत्ता | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १२४/२०२३-२४ | श्री. अब्दुल नासीर अब्दुल कादिर अढाळ (कर्जदार) | घर नं.५८१/३, तळोजा पाचानंद, तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड. | २,४८,६०५/ |
| २ | १२५/२०२३-२४ | श्री. योगेश शिवाजी औटे (श्री. अंकुश बबन गायकर, कर्जदार यांचे जामिनदार) | घर क. ९, बिल्डींग नं.१, प्लॉट नं.१,२ व ३, वसंतनगर, नेवाळी, पो-भादई, ता. पनवेल, जि.रायगड. | २,३०,६८७/- |
| ३ | १२६/२०२३-२४ | श्री. प्रदीप मारूती कदम (कर्जदार) | वाल्मिकीनगर, परदेशी आळी, जुने पनवेल, रायगड | २,७९,२६९/- |
| | | श्री. विजय लक्ष्मण धोत्रे (जामिनदार) | बामा केणी चाळ, पाली देवद, सुकापूर, ता. पनवेल, जि. रायगड. | |
| ४ | १२८/२०२३-२४ | श्री. विजय त्रिंबक मुंढे (कर्जदार) | घर क. ३०५, घरसंसार, चिपळे, विनायक कॉम्पलेक्स जवळ, माथेरान रोड, पनवेल, जि. रायगड. | २,४३,४१६/- |
| ५ | १२९/२०२३-२४ | श्री. राहुल रामदास पाटील (श्री. सचिन परशुराम तांबडे, कर्जदार यांचे जामिनदार) | घर क. १९८, हनुमान मंदिर जवळ, मोहो, पो. चिखले, ता. पनवेल, जि. रायगड | २,४४,६३४/- |

सदरची नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली असे.

**स्थळ : पनवेल**
**दिनांक : २७/०५/२०२४**

**सही/-**
**(श्रीम. भारती काटुळे)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था पनवेल, जि. रायगड**

जावक क.: १२५८/२०२४ | दिनांक २७/५/२४

## जाहीर नोटीस

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ खाली दाखल दावा नोटीस महात्मा फुले को. ऑप. क्रे. सो. लि., पनवेल या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्ती विरूध्द थकीत कर्जाचा भरणा केला नसल्याने नमूद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली, तथापि खालील नमूद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणणे दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या जाहीर नोटीसीव्दारे आपणांस पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबत अंतिम सुनावणी दनांक ०३/०६/२०२४ रोजी सकाळी ११:३० वाजता ठेवण्यात आली असुन सदर सुनावणीस आपण स्वतः वा आपले प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहवे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निर्णय दिला जाईल.

| अ. क्र. | दावा क्र. | प्रतिवादीचे नाव | पत्ता | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १३१/२०२३-२४ | श्री. अब्दुल नासीर अब्दुल कादिर अढाळ (कर्जदार) | घर नं.५८१/३, तळोजा पाचानंद, तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड. | ४६,६३२/- |
| २ | १३३/२०२३-२४ | श्री. विजय त्रिंबक मुंढे (कर्जदार) | घर क. ३०५, घरसंसार, चिपळे, विनायक कॉम्पलेक्स जवळ, माथेरान रोड, पनवेल, जि. रायगड. | ७१,८४५/- |
| | | श्री. आसिफ अब्दुला शेख (जामिनदार) | भारतनगर, पोल मोहल्ला, जामा मस्जिव जवळ, ता. पनवेल, जि. रायगड. | |
| ३ | १३४/२०२३-२४ | श्री. सचिन परशुराम तांबडे. (कर्जदार) | घर क. १०१, धाकटा खांदा, गणपती मंदिर जवळ, ता. पनवेल, जि. रायगड. | ४६,३३७/- |
| | | श्री. जयदास गजानन पाटील (जामिनदार) | घर क. ६८५, मातोश्री निवास, मोहो, पो. चिखले, ता. पनवेल, जि. रायगड | |
| ४ | १३६/२०२३-२४ | श्री. संजय दत्ताराम डोके (श्रीमती. शोभा चंद्रकांत चव्हाण, कर्जदार यांचे जामिनदार) | फ्लॅट नं. ३०३, ओ विंग, बिल्डींग नं.२, गोकुळ कॉम्प्लेक्स, पनवेल, जि. रायगड - ४१० २०६ | ४४,२४५/- |
| | | श्री. संतोष चंद्रकांत चव्हाण (श्रीमती. शोभा चंद्रकांत चव्हाण, कर्जदार यांचे जामिनदार) | घर नं. २७२, डेखवली अजिवली, ता. पनवेल, जि. रायगड- ४१०२२१ | |

सदरची नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली असे.

**स्थळ : पनवेल**
**दिनांक : २७/०५/२०२४**

**सही/-**
**(श्रीम. भारती काटुळे)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था पनवेल, जि. रायगड**

# खालापुरातील विविध शाळांचे सुयश

**खोपोली** : शिशुमंदिर इंग्रजी माध्यम शाळेचा निकाल १०० टक्के निकाल लागला. प्रथम तन्वी म्हात्रे ९६ टक्के, द्वितीय जैनी ओसवाल ९५ टक्के, तृतीय क्रमांक यश सावंत ९५ टक्के मिळविले. ग्रामीण भागातील सह्याद्री विद्यालयाच्या ९५ टक्के निकाल लागला. या शाळेतील प्रथम रिया शेवाळे ८५.८० टक्के, द्वितीय श्रावणी पवार ८५.६० टक्के, तृतीय आरती माने ८४ टक्के, चौथा निर्मित सुर्वे, पाचवी श्रुती मुंगुरकर ८१ टक्के मिळविले. देवन्हावे विद्यालयाचा ८४ टक्के निकाल लागला. प्रथम आयुष वेळासकर ७३.८ टक्के, द्वितीय प्रीती वाघमारे ६४.८ टक्के, तृतीय जानवी कदम ६०.६ टक्के मिळविले. खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या सावरोली विद्यालयाचा ७८ टक्के निकाल लागला. प्रथम नंदिनी बोर्ले ८३.८ टक्के, द्वितीय अथर्व कांबळे ७६.६ टक्के, तृतीय कार्तिकी खाडे ७४.८ टक्के, चतुर्थ श्रुतिका चिले ६५.२ टक्के, तर पाचवी समृद्धी घोंगे ६४.४ टक्के मिळवून उत्तीर्ण झाले.

## डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली ४१५ ७१२. जिल्हा रत्नागिरी (महाराष्ट्र)
### निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग

### कृषि तंत्र पदविका, मत्स्य अभियांत्रिकी पदविका व बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया २०२४-२५

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता कृषि तंत्र पदविका, मत्स्य अभियांत्रिकी पदविका व बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया विद्यापीठ स्तरावर 'ऑफलाईन पध्दतीने' राबविण्यात येत आहे. विद्यालये, प्रवेश क्षमता, आरक्षण इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली प्रवेश माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज विद्यापीठ संकेतस्थळ www.dbskkv.org वर दिनांक २४/०५/२०२४ पासून व बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासकम दिनांक २४/०५/२०२४ पासून उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

**अभ्यासक्रम, प्रवेश पात्रता व शुल्क**

| अ. क्र. | अभ्यासक्रम | कालावधी | प्रवेश अर्ज शुल्क (रुपये) | पात्रता | प्रवेश अर्ज सादर करावयाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | कृषि तंत्र पदविका (मराठी माध्यम) | २ वर्ष | खुला प्रवर्ग ४००/- आरक्षित प्रवर्ग २००/- | उमेदवार महाराष्ट्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा मंडळाची माध्यमिक शालान्त परीक्षा (इ. १० वी) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण | दिनांक २४/०५/२०२४ ते २९/०६/२०२४ |
| २. | मत्स्य अभियांत्रिकी पदविका (Fisheries Engineering) (इंग्रजी माध्यम) | ३ वर्षे | | | |
| ३. | बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र | १ वर्षे | खुला प्रवर्ग ५०/- आरक्षित प्रवर्ग २५/- | इयत्ता ९ वी उत्तीर्ण | दिनांक २४/०५/२०२४ ते २९/०६/२०२४ |

आरक्षित प्रवर्ग - अ.जा.,अ.ज., वि.जा.*, भ.ज.*, इ.मा.व.*, वि.मा.प्र.*, एस.ई.बी.सी.*, इ.डब्ल्यू .एस.*
(* उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य)

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवायची कार्यपध्दती.**

- उमेदवाराने www.dbskkv.org या संकेतस्थळावरील Admission या टॅबवर क्लिक करुन कृषि पदविका व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमासाठीचा प्रवेश अर्ज दिनांक २४/०५/२०२४ पासून व बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी प्रवेश अर्ज दिनांक २४/०५/२०२४ पासून डाउनलोड करुन, A 4 पेपरवर प्रिंट काढून माहिती पुस्तिकेतील सूचनांचे पालन करुन स्वहस्ताक्षराने पूर्ण भरुन प्रवेश घ्यावयाच्या विद्यालय/केंद्रामध्येच विहित मुदतीत सादर करावा. यानंतर प्रवेश अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध राहणार नाही.
- प्रवेश अर्ज भरताना उमेदवाराने पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र, उमेदवाराची स्वाक्षरी व आवश्यक ती संबंधित मूळ कागदपत्रे साक्षांकीत/स्वसाक्षांकीत करुन, प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या कृषि तंत्र विद्यालय/मत्स्य अभियांत्रिकी पदविका विद्यालय/बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम केंद्रात प्रवेश अर्जासह विहित शुल्क भरुन सादर करावे. **(शुल्काची रक्कम ही ना परतावा असेल याची अर्ज भरणा-या उमेदवाराने नोंद घ्यावी)**.
- प्रवेश अर्ज भरतेवेळी प्रवेश अर्जाचे शुल्क रोखीने / डीडीने संबंधित विद्यालय/केंद्रात भरावे व पावती घ्यावी. अंतिम तारखेनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात न घेता रद्दबातल ठरविण्यात येतील याची नोंद घ्यावी.
- अधिक तपशीलासाठी निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली, या कार्यालयाशी संपर्क साधावा. मोबाईल नंबर ९४२३२९५७८२, ९४२२५००२५०
- माहिती पुस्तिका विद्यापीठ संकेतस्थळ www.dbskkv.org दिनांक २४/०५/२०२४ तसेच बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठीची माहितीपुस्तिका दिनांक २४/०५/२०२४ पासून उपलब्ध करुन देणेत आली आहे.

ठिकाण : दापोली
दिनांक : २४/०५/२०२४

**सही/**
**कुलसचिव,**
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जिल्हा - रत्नागिरी.

## पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ | फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
ई-मेल : panvelcorporation@gmail.com

कार्यालय जा. क्र. पमपा/कर/२८२४/प्र.क्र. ८३/१३८०/२०२४ | दि. २७/०५/२०२४

## जाहीर सुचना

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्ता धारकांना जाहिर सूचना करण्यात येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांर्तगत सर्व मालमत्तांना मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली आहे.

सन २०२४ - २०२५ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका क्षेत्रासाठी सर्व मालमत्ता धारकांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम ५५ अन्वये मालमत्ता कराची सुधारित देयके ऑनलाईन पध्दतीने दिनांक २६ मे २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली असून ती प्रत्यक्ष बजावणेत येत आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालय, स्पेशल लिव्ह पिटीशन क्रमांक: १०८४९/२०२३ मधील सिव्हील अपील क्रमांक ००६०६५/२०२४ मधील, दिनांक २९/०४/२०२४ रोजीच्या अंतरिम निर्णयाच्या अनुषंगाने, तसेच याबाबत दाखल झालेल्या मिसेलिनियस अप्लीकेशन क्रमांक ९५२/२०२४ बाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १८ मे २०२४ रोजी दिलेल्या स्पष्टीकरणानुसार मालमत्ता कराच्या देयकाचे भाग अ, ब व क प्रमाणे वर्गीकरण करणेत आलेले आहे. १) दिनांक ०१/१०/२०१६ ते सन २०२०-२१ या कालावधीची रक्कम भाग अ (Part - A) मध्ये दर्शविण्यात आली असून भाग अ (Part - A) मधील थकीत रक्कम मिळकतधारकाने भरणा केल्यास, ती, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त अंतरिम निर्णयास अधीन असेल. २) देयकातील भाग अ (Part - A) मधील शास्तीची रक्कम, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या, याबाबतीत, भविष्यातील निर्णयानुसार परिगणना करून वसूलपात्र असेल. ३) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त अंतरिम निर्णयानुसार देयकामधील सन २०२१-२२ ते सन २०२३-२४ या कालावधीची भाग ब (Part - B) मध्ये दर्शविण्यात आलेली रक्कम दिनांक २९ जून २०२४ अखेरपर्यंत भरणा करणे अनिवार्य आहे. ४) सन २०२४-२५ या चालू वर्षाची देयकातील रक्कम भाग - क (Part - C) मध्ये दर्शविण्यात आलेली आहे. **मा सर्वोच्च न्यायालय, स्पेशल लीव्ह पिटीशन क्रमांक १०८४९/२०२३ मधील सिव्हिल अपील क्रमांक ६०६५/२०२४ मधील, दिनांक २९/०४/२०२४ रोजीचा अंतरिम निर्णय** https://www.panvelcorporation. com **या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

तथापि, महानगरपालिका क्षेत्रातील ज्या मालमत्ता धारकांना अद्यापपर्यंत मालमत्ता कराची देयके प्राप्त झालेली नाहीत, त्या मालमत्ता धारकांनी panvelmc.org किंवा PMC TAX - APP वर नोंदणी करुन ऑनलाईन पध्दतीने मालमत्ता कराची देयके प्राप्त करुन घ्यावीत. तसेच, ज्या मालमत्ता धारकांना ऑनलाईन पध्दतीचा वापर करुन मालमत्ता कराची देयके प्राप्त करुन घेणे शक्य नाही अशा मालमत्ता धारकांनी मुख्यालयात किंवा संबंधित प्रभाग कार्यालयामधून देयके उपलब्ध करुन घ्यावीत. सदर प्रमाणे कार्यवाही न झाल्यास ऑनलाईन प्रसिध्दी दिनांकापासून देयके बजावण्यात आलेली आहेत असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

तसेच भाग - क मधील सन २०२४-२५ या चालू वर्षाचा मालमत्ता कराचा एकरक्कमी भरणा दिनांक ३० जून २०२४ अखेर केल्यास चालू मागणीवर ५% सुट लागू असेल. त्याचप्रमाणे मालमत्ता कराचा ऑनलाईन पध्दतीने भरणा केल्यास अतिरिक्त २% सुट लागू असेल.

ज्या मालमत्ता धारकांना महानगरपालिकेमार्फत सुधारित देयके अद्याप प्राप्त झालेली नसल्यास त्यांनी आपली देयके ऑनलाईन किंवा ऑफलाईन व्दारे प्राप्त करुन घेऊन मालमत्ता कराचा भरणा लवकरात लवकर करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे.

**सही/-**
**(प्रशांत रसाळ)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**पनवेल महानगरपालिका**

# मोरबे धरणातील जलसाठ्यात घट

## नवी मुंबईकरांनी पाणी जपून वापरण्याचे महापालिकेचे आवाहन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यातील बहुतांश धरणांनी तळ गाठल्याने अनेक ठिकाणी टँकरने पुरवठा सुरू करण्यात आला आहे, तर मुंबई, ठाणे महापालिका क्षेत्रात पाणी कपातीचा निर्णय घेण्यात आला आहे. उम्यामुळे नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणातील साठाही कमी झाला आहे. अशीच परिस्थिती कायम राहिल्यास आणि पावसाला विलंब झाल्यास शहरवासीयांवरही पाणीकपातीचे संकट ओढावू शकते.



गतवर्षी समाधानकारक पाऊस झाल्याने सप्टेंबर अखेरीस मोरबे धरण पूर्ण भरले होते, त्यामुळे ऑगस्टपर्यंत पाणीसाठा पुरेल, असा अंदाज नवी मुंबई महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने वर्तवला होता, मात्र वाढत्या तापमानामुळे धरणातील साठा झपाट्याने कमी होत आहे. सध्या धरणात ३१.६२ टक्का साठा शिल्लक असून आणखी ६२ दिवस पुरेल, असा अंदाज आहे, मात्र हवामान बदलामुळे पावसाचे आगमन लांबल्यास नवी मुंबईकरांना पाणी कपातीचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे आतापासून पाणी जपून वापरण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

मोरबेतील साठा वर्षभर पुरावा यासाठी नवी मुंबई महापालिकेने पावसाळ्यांनतर वॉर्डनिहाय एक दिवस पाणी कपातीचा निर्णय घेतला आहे. तर पाणी बचतीसाठी मलनिस्सारणच्या पाण्यावर प्रक्रिया करून उद्याने, दुभाजकांमधील झाडांना त्याचप्रमाणे प्रायोगिक तत्त्वावर सार्वजनिक शौचालयांतही करण्यात येत आहे.

सुरुवातीला मोरबे धरणातील साठा हा ऑगस्टपर्यंत पुरेल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले होते, पण आता कडक उन्हामुळे पाण्याची पातळी खालावली असून धरणांमध्ये ३१.६२ टक्केच साठा शिल्लक आहे. त्यामुळे २५ जुलैपर्यंत पुरेल इतकेच पाणी शिल्लक असल्याने नवी मुंबईकरांवर पाणी कपातीचे संकट ओढवू शकते. त्यामुळे पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहन महापालिकेकडून करण्यात येत आहे.

दिघा, ऐरोली या भागांत एमआयडीसीच्या बारवी धरणांतून पाणीपुरवठा करण्यात येतो, तर एमआयडीसीकडून नवी मुंबई महापालिकेला ७० एमएलडी पाणी मिळणे अपेक्षित आहे, मात्र प्रत्यक्षात ४० ते ४५ एमएलडी पाणी मिळत असल्यामुळे पालिकेच्या अधिकाऱ्यांची डोकेदुखी वाढली आहे. एमआयडीसीकडून ७० एमएलडी पाणी मिळावे, यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. तर बारावी धरणांमधून कमी पाणी मिळत असल्यामुळे दिघा विभागातही कमी दाबाने पाणीपुरवठा होतो.

**नवी मुंबई महापालिकेच्या मोरबे धरणात २५ जुलैपर्यंत पुरेल इतका साठा शिल्लक आहे. पावसाळा लांबणीवर गेल्यास पाणीकपात करण्यात येईल, पण तुर्तास याबाबत निर्णय घेण्यात आलेला नाही, तरीही नागरिकांनी पाणी जपून वापरावे.**
**-अरविंद शिंदे, कार्यकारी अभियंता, नवी मुंबई महानगरपालिका**

### धरणात ३१.६२ मिलिमीटर साठा

मोरबे धरणात ३१.६२ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. धरण परिसरात २०२२ मध्ये ३५५९.४० मिलिमीटर पावसाची नोंद झाली होती. तर २०२३ मध्ये ३७९५.६० मिमी पावसाची नोंद झाली आहे. यंदा मान्सून वेळेत होणार असल्याचे हवामान खात्याकडून स्पष्ट करण्यात आल्याने तुर्तास नवी मुंबई महापालिकेकडून पाणीकपात करण्यात येत नाही, पण वेळेत पाऊस न आल्यास पाणीकपातीचे संकट ओढावू शकते.

# माझी वसुंधरा अभियानांतर्गत पथनाट्यातून पर्यावरण जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

शहरातील पर्यावरण सुधारण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व हवामान बदल विभागाच्या वतीने माझी वसुंधरा अभियान राबविले जात असून नवी मुंबई महापालिकेने अभियानांतर्गत विविध उपक्रम राबवत नेहमीच चांगली कामगिरी केलेली आहे.

या वर्षीही माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. यामध्ये लोकसहभागावर विशेष भर देण्यात येत असून व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे.

पर्यावरण विषयक जनजागृती करताना पथनाट्यासारख्या लोकांना चटकन् भावणाऱ्या माध्यमाचा प्रभावी उपयोग करण्यात येत असून २१ मेपासून नमुंमपा क्षेत्रातील आठही विभागांमध्ये वर्दळीच्या ठिकाणी पथनाट्यांचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये भूमी, वायू, जल, अग्नी व आकाश या निसर्गाच्या पंचतत्वांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी दैनंदिन जीवनात प्रत्येक माणसाने करावयाच्या छोट्या छोट्या बाबींची माहिती पथनाट्यांच्या माध्यमातून त्यावर हसत खेळत भाष्य करीत सादर करण्यात आली असून या माध्यमातून जनजागृतीवर भर देण्यात आला आहे.

महापालिकेच्या आठही विभागांत गर्दी असते अशा मुख्य २२ ठिकाणी सादर झालेल्या माझी वसुंधरा अभियानविषयक पथनाट्यांना उपस्थितांचा चांगला प्रतिसाद लाभला असून पथनाट्य सादरीकरण करणाऱ्या कलावंत समुहाचे उपस्थिांकडून कौतुक झाले आहे.

पथनाट्याप्रमाणेच मोठ्या सोसायट्यांमध्ये जाऊन माझी वसुंधरा अभियानामध्ये पर्यावरण संवर्धन माहितीपूर्ण कार्यशाळा आयोजित करूनही जनजागृतीवर भर दिला जात असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त शिरिष आरदवाड यांनी दिली आहे.





# वैशाली कोळी प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग

**नवी मुंबई : बातमीदार**




लेडी चिटर वैशाली कोळी आणि साथीदारांनी केलेल्या आर्थिक फसवणूकीप्रकरणी खांदेश्वर पोलिसांकडून काढून हा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्याची मागणी लक्षात घेवून पोलीस उपायुक्त विवेक पानसरे यांनी तशी शिफारस आयुक्तांकडे केली. त्यानुसार हा गुन्हा तिकडे वर्ग करण्यात आला आहे.

आम आदमी पार्टीची महानगर प्रमुख असलेली वैशाली कोळी हिने तिच्या व्यावसायिक कंपनीच्या माध्यमातून अश्विनी भोसले, (५६ लाख), सविता शेंडे (एक कोटी ४५ लाख), सोनल वारदे (९५ लाख) यांची आर्थिक फसवणूक केली होती. यात सोन्या-चांदीच्या दागिन्यांचाही समावेश आल्याने दोन कोटी ७४ लाख रुपयांची हेराफेरी केल्याचा गुन्हा खांदेश्वर पोलिसांत दाखल केला आहे.

वैशाली कोळी, तिचा पती संतोष कोळी, मुलगा चैतन्य कोळी, भागीदार श्रीकृष्ण मिलन ऊर्फ बाबा शुक्ला आदी आरोपींचा यात समावेश आहे. खांदेश्वर पोलिसांकडे आलेल्या अन्य तक्रारदारांचा मुख्य गुन्ह्यात समावेश करुन गुन्ह्यांची व्याप्ती तीन कोटी आठ लाख रुपयांची केली आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत लांडगे यांनी दिली आहे.

# पनवेलमध्ये निधी आपके निकट शिबिर

## [ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ]

**नवी मुंबई : बातमीदार**

निधी आपके निकट - २.०' भविष्य निर्वाह निधी सदस्य, नव्याने समाविष्ट संस्था आणि निवृत्तीवेतनधारकांसाठी सुरू आहे. या वेळी, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना प्रादेशिक कार्यालय, वाशी यांनी पीएफ खातेदार, नवीन समाविष्ट संस्था आणि पेन्शनधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांच्या अखत्यारीतील ठिकाणी अंजुमन-ए-इस्लाम ठाणा नका पनवेल येथे आयोजन केले होते.

या वेळी पेन्शनधारकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

अनेकांच्या समस्या सोडवण्यात आल्या. अनेकांना सल्ले देण्यात आले. पनवेलमध्ये या शिबिराचे आयोजन केल्याने नागरीकांचा वाशीला जाण्याचा वेळ वाचला. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. याकार्यक्रमात खातेदारांना त्यांच्या कामासाठी क्षेत्रीय कार्यालय, वाशी येथे यावे लागू नये म्हणून पीएफ, नव्याने समाविष्ट संस्था आणि निवृत्तीवेतन यासंबंधीच्या तक्रारी ऐकून घेतल्या गेल्या. याशिवाय, नवीन समाविष्ट आस्थापनांच्या नियुक्त्यांना पीएफ संबंधित मार्गदर्शनदेखील करण्यात आले.

# बेलापूरमध्ये ४८ अनधिकृत झोपड्या केल्या जमीनदोस्त



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रातील अे विभाग बेलापूर कार्यालयांतर्गत बेलापूर ब्रिजखाली, बेलापूर, नवी मुंबई येथे अनधिकृतपणे झोपड्या उभारण्यात आलेल्या होत्या.

आयुक्तांच्या या आदेशान्वये व उपायुक्त यांच्या मार्गदर्शनानुसार अे विभाग बेलापूर कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त शशिकांत तांडेल यांच्या नियंत्रणाखाली सदर बेलापूर ब्रिजखाली, बेलापूर, नवी मुंबई येथील ४८ अनधिकृत झोपड्या अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करुन निष्कासित करण्यात आल्या आहेत.

या धडक मोहिमेसाठी अे विभाग कार्यालय अंतर्गत बेलापूर मधील अधिकारी/ कर्मचारी कनिष्ठ अभियंता मयुरेश पवार, वरिष्ठ लिपिक स्वप्निल तारमळे, लिपिक नयन भोईर मजूर १०, जे.सी.बी - एक, पिकअप-एक तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलीस तैनात होते. यापुढेदेखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# घराचे सामान वाहणाऱ्या कामगाराचा दागिन्यांवर डल्ला

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

जुन्या घरातील सामान नव्या घरामध्ये ठेवण्यासाठी बोलावलेल्या कामगारांपैकी एकाने घरातील दीड लाख रुपये किमतीच्या दागिन्यांवर डल्ला मारल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. घरमालकाला महिन्याभरानंतर हा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात धाव घेत चोरीची तक्रार दाखल केली आहे.

खुशबू सिंग (वय ३८) या सध्या खारघर सेक्टर १९मध्ये कुटुंबासोबत राहत असून यापूर्वी सेक्टर ११मध्ये राहत होत्या. २९ एप्रिल रोजी नव्या घरात सामान नेण्यासाठी त्यांनी काही कामगारांना बोलावून घेतले होते. त्यानुसार महम्मद खालिद, महेंद्रकुमार आणि टेम्पोचालक ऋषिकांत यादव व इतर दोघांनी सिंग यांच्या घरातील सामान नव्या घरात हलवले. दरम्यान, सामान बाहेर काढताना सिंग यांनी आपले सोन्याचे दागिने एका प्लास्टिकच्या डब्यात ठेऊन तो डबा कपाटात ठेवला होता. २४ मे रोजी सिंग व त्यांचे पती घरातील सामान व्यवस्थित ठेवत असताना दागिन्यांचा डबा तपासला असता, दागिने गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घरातील सामान हलवण्यासाठी आलेल्या कामगारांपैकी महम्मद खालिद याने दागिने चोरल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

# कोपरखैरणे विभागामध्ये अनधिकृत बांधकामावर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत बजरंग महादेव गोळे (रूम नंबर ३३५, सेक्टर १५ कोपरखैरणे, नवी मुंबई) व कारभारी रामभाऊ ढोले (रूम नंबर १२२ सेक्टर ०५, कोपरखैरणे, नवी मुंबई) यांनी महापालिकेची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता अनधिकृतपणे आरसीसी स्वरूपाचे बांधकाम सुरू केले होते.

अनधिकृत बांधकामास कोपरखैरणे विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५४ अन्वये अनुक्रमे त्यांना २९ फेब्रुवारी २०२४ व २६ मार्च २०२४ रोजी नोटीस बजावण्यात आलेली होती, परंतु



त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरू ठेवले होते.

ही दोन्ही अनधिकृत बांधकामे २४ मे २०२४ रोजी निष्कासित करण्यात आलेली आहेत. या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाकडील अधिकारी अथवा कर्मचारी, आठ मजूर, एक गॅस कटर, दोन ब्रेकर, एक पीकअप व्हॅन कारवाईकरीता वापर करण्यात आले तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक तैनात होते.

यापुढेही अशा प्रकारे अतिक्रमणविरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार असल्याचे पालिकेकडून सांगण्यात आले आहे.

# विणीच्या हंगामात घरटे बांधण्यासाठी कावळ्यांची लगबग

**नवी मुंबई : बातमीदार**

सर्व पक्ष्यांतील चतुर पक्षी म्हणजे कावळा. मानवी वस्तीत राहून तो जास्तच हुशार झालेला दिसतो. सध्या उन्हाळा सुरू आहे. मनुष्यवस्तीत राहणाऱ्या व मनुष्याशी एकरूप झालेल्या या पक्ष्याचा विणीचा हंगाम सुरू झाला आहे. पावसाळ्याआधी या कावळ्यांचा विणीचा हंगाम असल्याने सध्या कावळ्यांची चोचीतून घरटी बांधण्याची लगबग सुरू झाली आहे. त्यामुळे सध्या जिथे पाहावे तिथे कावळा व कवळी चोचीत काड्या, तारा, प्लास्टीक पट्ट्या, दोरे, वायर्स घेऊन उडताना दिसत आहेत.



### असा साकारला जातो सुरक्षित निवारा

घरटे बांधताना अंडी किंवा पिल्ले पडणार नाहीत याची काळजी घेतली जाते. इतर पक्षी व प्राण्यांचे धोके पाहता कावळा शक्यतो झाडांवर घरटे बांधत नाही. मानवी वस्तीत असलेल्या झाडावर, खिडकी, ग्रिलमध्ये घरटे बांधतो. यामागे अंड्यांची व पिल्लांची सुरक्षितता हा भाग असतो. कावळा हुशार पक्षी आहे. घरटे बांधताना आपला जोडीदार काट्या काटक्या गोळा करायला गेल्यावर दुसरा जोडीदार आपल्या तयार होणाऱ्या घरट्यावर लक्ष ठेवून असतो. आपल्या घरट्याला धोका पोहचू नये ही त्यामागची भूमिका. मनुष्याचा धोका दिसताच मात्र दोन्ही कावळे कावकाव करत धोक्यावर तुटून पडतात व चोची मरतात.

सध्या मे महिना म्हणजेच तीव्र उन्हाळा सुरू असून पावसाची चाहूल काही दिवसांतच लागेल. साधारण एप्रिल शेवट व मे महिन्याच्या सुमारास कावळ्यांचा विणीचा हंगाम समजला जातो. त्यावेळेस कावळे घरटे बांधतात. त्यामुळे नेहमी आपल्या अन्नाकडे म्हणजेच कीटक, छोटे प्राणी, कबुतरे व चिमण्या या सावजांकडे लक्ष ठेवून तासनतास वाट बघत बसलेला कावळा आता घरटे बांधण्यात व्यग्र आहे. ही घरटी शक्यतो मानवी वस्तीच्या जवळ बांधली जातात. इमारतींच्या बाल्कनी, झाडे या जागा हेरल्या जातात. मानवाच्या जवळ जात घरटे बांधणारा कबुतरे व चिमण्यांसोबत कावळ्याचीदेखील गणना होते. कावळे घरटे बांधतात. इतर पक्ष्यांसारखी लहान काड्या व विणकाम केलेली घरटी करणे कावळ्याला जमत नसले तरी त्यातल्या त्यात मजबूत घरटे बांधण्याकडे कावळ्याचा कल असतो. मोठ्या काड्या, तारा, प्लास्टीक पट्ट्या, दोरे, वायर्स याचा पुरेपूर वापर केलेला कावळ्यांच्या घरट्यात आढळून येतो. इथे प्रश्न पडतो की, काड्या, तारा या कावळ्यांना किंवा त्यांच्या पिल्लांना टोचत नसाव्यात का? तर त्याचे उत्तर आहे नाही. कारण घरटे बनवताना ते पूर्णत्वास येताना कावळा व कावळी त्या घरट्यात बसून त्या घरट्यातील काट्या व तारा टोचणार नाहीत अशा पद्धतीने रचना तयार करतात. पक्ष्यांसारखे गोलाकार न करता काहीसे पसरट घरटे कावळे तयार करतात, मात्र ते तितकेच भक्कम बनवले जाते.

साधारण जून महिन्यात कावळीण ४ ते ५ अंडी देते. अंडी हिरवट निळ्या, मोरपीसी रंगाची असतात. ३ ते ४ आठवड्यांत या अंड्यांतून पिल्ले बाहेर येतात. कर्णकर्कश आवाजात काव काव करण्यास सुरुवात होते. या दरम्यान कावळे कोणासही आपल्या घरट्याजवळ फिरकू देत नाहीत. कबुतर चिमणी सोडाच पण खुद्द आपल्या जातीतील इतर कावळ्यांना घरट्यांजवळ येण्यास मनाई असते. चुकून एखादा पक्षी किंवा माणूस या घरट्याजवळ गेल्यास त्याला कावळ्यांच्या चोचीचा अथवा पायांचा प्रहार सहन करावा लागतो. इतके बारीक लक्ष हे कावळे आपल्या अंड्यांवर व पिल्लांवर ठेवतात, मात्र या कावळ्यांना एकच पक्षी फसवतो व आपले हित साध्य करतो. तो म्हणजे कोकीळ. कोकिळ पक्षाचा हाच काळ अंडी देण्याचा असतो.

स्वत:चे घरटे बनवण्यात हा पक्षी आळशी असल्याने अनेकवेळा कावळ्यांच्या घरट्यांत या पक्षाची अंडी दिसतात. अंड्यांच्या रंगात साधर्म्य असल्याने कवळीणीला ही ती ओळखू येत नाहीत. त्यामुळे कावळी आपल्या अंड्यांबरोबरच कोकिळेच्या अंडयाना मायेने ऊब देते. अगदी पिल्ले उडण्याएवढी सक्षम झाली तरीही कवळीणीला कोकिळेची पिल्ले ओळखत येत नाहीत. त्यातून पिल्ले बाहेर आली तरी कावळीं आपल्या पिल्लांबरोबरच या पिल्लांचे संगोपन करते. सांगोपन करताना नर कावळा पिल्लांना खाणे आणून देतो.

# शेतकऱ्यांच्या तक्रारी निवारणासाठी नियंत्रण कक्ष

**नवी मुंबई : बातमीदार**

खरीप हंगामात शेतकऱ्यांना बियाणे, खते व किटकनाशके आदींबाबत उद्‌भवणाऱ्या अडचणींचे निराकरण व्हावे, तसेच काळाबाजार व साठेबाजीला आळा बसण्याच्या उद्देशाने कृषी विभागामार्फत विभाग व प्रत्येक जिल्हास्तरावर निविष्ठा तक्रार निवारण कक्ष सुरू झाला आहे, अशी माहिती ठाण्याचे कोकण विभागीय कृषी सहसंचालक अंकुश माने यांनी दिली.

कृषी विभागाच्या या उपक्रमामुळे बियाणे, खते, किटकनाशके व इतर बाबींसंदर्भात काळाबाजार दिसताच थेट नियंत्रण कक्षात तक्रार देता येणार आहे. चालू खरीप हंगामाला काही दिवसांतच सुरुवात होणार आहे. बियाणे खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग सुरू झाली आहे. अशावेळी शेतकऱ्यांना खरीप हंगामावेळी येणाऱ्या अडचणींबाबत तक्रारी करता याव्यात, यासाठी विभागास्तरावर तसेच जिल्हास्तरावर निविष्ठा तक्रार निवारण कक्ष स्थापन करणेत आले आहेत. सदर नियंत्रण कक्षामध्ये कृषि विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे तसेच तक्रार निवारण कक्षाचा भ्रमणध्वनी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तक्रार नोंदविल्यानंतर लगेच शेतकऱ्यांच्या समस्येचे निराकरण केले जाणार आहे.

कृषी निविष्ठांची गुणवत्ता, किंमत, साठेबाजी व लिकींगबाबत असलेल्या तक्रारींचे निवारण केले जाईल. शेतकऱ्यांना कृषी निविष्ठांबाबत काही तक्रार असल्यास पुढे दिलेल्या निविष्ठा तक्रार निवारण कक्षांशी भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेलद्वारे संपर्क साधून तत्काळ तक्रार नोंदविण्यात यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## निवडक

### अपूर्वा जंगम यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार



**माणगाव** : महाराष्ट्र शिक्षक पॅनलतर्फे माणगावच्या शिक्षिका तथा शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्थेच्या सदस्या अपूर्वा अमोल जंगम यांना सेवासन्मान राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी सिनेअभिनेत्री किशोरी शहाणे, मित्र वनव्यामध्ये गारव्यासारखा फेम कवी अनंत राऊत, अध्यक्ष दीपक चामे, उपाध्यक्षा मेघाराणी जोशी, रायगडच्या निवड समिती सदस्या मधुरा पालांडे उपस्थित होते. त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. अपूर्वा जंगम यांनी विविध शाळांतून शिक्षिका म्हणून काम करताना विद्यार्थ्यांना संस्कारक्षम शिक्षण देऊन ज्ञानदानाबरोबरच ग्रामस्थांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन पटसंख्या वाढविण्याच्या दृष्टीनेही त्या प्रामाणिकपणे काम करीत असतात.

### नांदगाव हायस्कूलचा ९३.१३ टक्के निकाल

**मुरूड** : तालुक्यातील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयाचा दहावीचा निकाल ९३.१३ टक्के एवढा लागला असून शामल नथुराम पाटील या विद्यार्थिनीने ८५ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला, तर द्वितीय क्रमांक राज तुळसकर ७९.६० टक्के, तृतीय क्रमांक आयुष पाटील याला ७७.८० टक्के, चतुर्थ क्रमांक शर्वरी नाक्ती ७७.६० टक्के, सृष्टी पाटील हिला ७७.४० टक्के मिळवून पाचवा क्रमांक मिळवला आहे. दहावी परीक्षेसाठी १०२ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ९५ मुले पास झाली आहेत. सात विद्यार्थी डिस्टिंक्शनमध्ये तर ३० विद्यार्थ्यांनी फर्स्ट क्लासमध्ये गुण मिळवले आहेत. या हायस्कूलचा सेमी इंग्रजी माध्यमाचा निकाल १०० टक्के लागला आहे. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे शाळेचे चेअरमन फैरोज घलटे, मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ, पर्यवेक्षिका अर्चना खोत, सर्व संचालक, सदस्यांनी अभिनंदन केले आहे.

### नागोठणे विद्यालयाचा निकाल ९६.५९ टक्के

**नागोठणे** : येथील कोएसो. गु.रा. अग्रवाल विद्यामंदिरचा निकाल ९६.५९ टक्के लागला. यामध्ये आचल नामदेव मढवी व श्रेया माधव भोईर या विद्यार्थिनींनी ८७.८० टक्के मिळवून शाळेत प्रथम क्रमांक मिळविला. द्वितीय क्रमांक यज्ञा रघुनाथ शिर्के ८७.६० टक्के व तृतीय क्रमांक संस्कार तुळशीराम तेलंगे ८५ टक्के मिळविला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे चेअरमन नरेंद्र जैन, मुख्याध्यापक यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

### पालकर विद्यामंदिरचा ९० टक्के निकाल

**चौक** : सरनोबत नेताजी पालकर विद्यामंदिर चौक या माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल ९० टक्के लागला असून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे. खालापूर तालुक्यातील चौक येथील सरनोबत नेताजी पालकर विद्यामंदिर, चौक या ग्रामीण भागातील विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल लागला असून भाविका मुसळे ७५.२० टक्के, आर्या दळवी ६६.६० टक्के, वेदिका फाटे ६३ टक्के, सारीका कातकरी ६० टक्के व कार्तिक कातकरी ५५.८० टक्के गुण प्राप्त करून शाळेत प्रथम पाचमध्ये आले असून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शिक्षक, संस्था व पालकांनी अभिनंदन केले.

### कुरूळ विद्यालयाचा ८६ टक्के निकाल

**अलिबाग** : मार्च २०२४मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत कुरुळ येथील सुएसो माध्यमिक विद्यालयाचा निकाल ८६.३६ टक्के लागला आहे. शबा रिजवाना रजिउल्ला सिद्दीकी ८४.८० टक्के प्रथम, अपूर्वा धनश्री माधव गोसावी ७८.४० टक्के द्वितीय, प्रणय भारवी भरत कांबळे याने ७८.२० टक्के मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. स्थानिक शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ॲड. प्रसाद पाटील, शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता पाटील यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# अवजड वाहनांमुळे कशेडी घाटात वाहतूक कोंडी

## चार किमीपर्यंत रांगा; प्रवासी त्रस्त



**पोलादपूर : रामप्रहर वृत्त**

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी बोगदा केवळ हलक्या वाहनांसाठी खुला करण्यात आला आहे. असे असताना या मार्गावरून दिवस-रात्र बिनधोकपणे अवजड वाहनेही धावत असल्याने अन्य वाहनांना मार्गस्थ होताना अडथळा निर्माण होत आहे.

अवजड वाहतुकीवर नियंत्रण आणण्यासाठी बोगद्याच्या दोन्ही बाजूला कशेडी येथील वाहतूक पोलीस तैनात करण्यात यावे, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे. मालवाहक तसेच अवजड वाहतूक करणाऱ्या चालकांकडून नियमांचे उल्लंघन करण्यात येत असल्याने शनिवारी सायंकाळी कशेडी घाटात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. चार किमीपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

एकाच वेळी दोन्ही बाजूकडील वाहने समोरासमोर आल्याने कोंडीत आणखी भर पडली होती. सुमारे तासभरानंतर ही कोंडी फुटली आणि वाहतूक संथगतीने सुरू झाली.

पूर्वी कोकणात जाण्यासाठी लहान वाहनेच कशेडी बोगद्यातून मार्गस्थ व्हायची. आता मात्र टप्प्याटप्प्याने घाटमार्गातील काम पूर्ण करण्यात येत आहे. पर्यटकांचा ओघ व सुट्टीचा हंगाम लक्षात घेता, बोगद्यामधून दोन्ही बाजूने वाहतूक सुरू करण्यात आली आहे, मात्र याठिकाणी वाहतूक पोलीस नसल्याने रात्रीच्या वेळी ट्रक, टेम्पोसह, खासगी बस आदी अवजड वाहने मोठ्या संख्येने मार्गस्थ होतात. अनेकदा ही वाहने घाटमार्गात बंदही पडतात. त्यामुळे वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो.

## दहावीच्या परीक्षेत रोहा पब्लिक स्कूलचा १०० टक्के निकाल





**रोहे** : रोहा शहरात शैक्षणिकदृष्ट्या अग्रेसर असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या रोहा पब्लिक स्कूलने दहावीच्या परीक्षेतील निकालाची यशाची परंपरा कायम ठेवली असून यावर्षीही रोहा पब्लिक स्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे.

शाळेत दहावीला ३१ विद्यार्थी बसले होते. या शाळेत प्रथम श्रेणीत २६ विद्यार्थी व द्वितीय श्रेणीत पाच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शाळेत प्रथम क्रमांक भक्ती सचिन मोरे ९० टक्के, द्वितीय आर्यन राजेश नागावकर ८७.८० टक्के, तृतीय अंजली हौसेराव पवार ८७.४० टक्के मिळवून यश संपादन केले आहे.

## माणगावच्या वाघरे इंग्लिश मीडियम स्कूलचे धवल यश

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२४मध्ये घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा निकाल सोमवारी (दि.२७) जाहीर झाला. या परीक्षेत तालुक्यातील गणेश यशवंत वाघरे इंग्लिश मिडीयम स्कूलचा निकाल १०० टक्के इतका लागला. सुमीत जयशंकर पांडे या विद्यार्थ्याने ९३.२० टक्के मिळवून शाळेत प्रथम येण्याचा मान पटकावला आहे.

अभय धनंजय पार्टे व नहुश संतोष भोनकर यांनी अनुक्रमे ९२ टक्के द्वितीय, दिव्या दत्ताराम दिवेकर ९१.८० टक्के तृतीय क्रमांक पटकावला. या शाळेमधून यावर्षी दहावी परीक्षेसाठी एकूण ४३ विद्यार्थी बसले होते. हे सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यामध्ये ४० विद्यार्थ्यांनी विशेष श्रेणी प्राप्त केली असून तीन विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. सहा विद्यार्थ्यांना ९० टक्केपेक्षा अधिक गुण प्राप्त झाले आहेत.

यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, सदस्य, स्कूल कमिटी चेअरमन अरुण पवार, मुख्याध्यापिका मनीषा मोरे, सर्व शिक्षक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत, १) श्रीमती. नागूबाई दुनकुर काठे उर्फ सौ. नागूबाई शांताराम कोपरकर रा. बुर्दूल पो. असोडे, ता. अंबरनाथ जि. ठाणे ४२१ ३०१ २) श्री.बाळाराम दुनकुर काठे ३) श्री. बळीराम दुनकुर काठे ४) श्री. कृष्णा दुनकुर काठे सर्व रा. मु.नितळस पो. वावंजे, ता. पनवेल जि. रायगड ४१०२०८ यांच्या नावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकत' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नितळस ता पनवेल जिल्हा रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३२ | ६ | ०-४७-३०<br>पो.ख. ०-००-८०<br>एकूण ०-४८-१०<br>पैकी ०-२५-०० इतके क्षेत्र | ७.९४ |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**दिनांक : २८.०५.२०२४**

**सही /-**
**ॲड. मनीष आर बोहरा**
**१०४,१४२अ, धनश्री बिल्डिंग, एम.सी.सी.एच. सोसायटी, पनवेल ४१० २०६**
**मो.नं.९७०२३५११११/७०२१७७९६७९**


## म्हसळा तालुक्याचा ९८ टक्के निकाल

**म्हसळा : प्रतिनिधी**

मार्च २०२४मध्ये झालेल्या एसएससी परीक्षेचा निकाल सोमवारी (दि.२७) जाहीर झाला. तालुक्याचा एकूण निकाल ९८ टक्के लागला असून न्यू इंग्लिश स्कूलचा निकाल १०० टक्के लागला, तर अंजुमन हायस्कूलचा निकाल ९८ टक्के लागला.

न्यू इंग्लिश स्कूलची सृष्टी वालवटकर ९२.२० टक्के प्रथम, ओम कुलकर्णी ९२ टक्के द्वितीय तर स्वयम शेट्ये याला ८८ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळाला. अंजुमन हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेजचा अब्दुल्लाह इस्माईल जळगावकार ९२.६० टक्के प्रथम, जुनेद लांगे ९१.८० टक्के द्वितीय आणि अहमद रजा हुसैन ९०.६० टक्के मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. मागास वर्गीयांत न्यू इंग्लिश स्कूलची सृष्टी वालवटकरने तालुक्यात प्रथम येण्याचा मान मिळविला.

स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन नासिर मिठागरे, हलका कमिटी अध्यक्ष फझल हलडे, गटशिक्षणाधिकारी संतोष दौंड, गटविकास अधिकारी जाधव, अंजुमन प्राचार्य अ. रहमान घराडे, प्राचार्य प्रकाश हाके, यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या.


सिडको
शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना
**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यांत येते की, मौजे-उलवे, ता. पनवेल, जि.रायगड येथील खालील नमूद केलेली जमीन मुळ भूधारक श्री. अनंत देवराम खारकर व इतर यांचेकडून नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे. भूसंपादन कायद्यानुसार सदर जमिनीची देय होणारी नुकसान भरपाई वरील भूधारकांनी स्वीकारली असून संपादित जमिनीचा ताबा देखील त्यांनीच दिला आहे.

**संपादित जमीन व इरादित भूखंडांचा तपशील पुढीलप्रमाणे:**

| गाव/ निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हि. क्र. | क्षेत्र (हे.आर) | मंजूर पात्रता (चौ.मी) | निवाडाधारकाचे नाव | इरादित भूखंडाचा तपशील: नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उलवे २७३ | १०८/३ | ०-१०-९ | १०० | श्री. अनंत देवराम खारकर व इतर | उलवे | १५ | C-२९ | १०० |

शासन निर्णयानूसार साडेबारा टक्के योजनेअंतर्गत वरील तक्त्यात नमूद संपादित जमिनीपोटी मंजुर १०० चौ.मी. पात्रतेकरिता भूधारकांना दिनांक १३.०७.२००७ रोजीच्या संगणकीय सोडतीद्वारे उलवे नोड येथील भूखंड क्र. २६४, सेक्टर-०३, क्षेत्र-१०० चौ.मी. हा भूखंड इरादित करण्यात आला होता. परंतू सदर भूखंडावर त्रयस्थ व्यक्तीचे बांधकाम असल्यामुळे सदर उलवे नोड येथील भूखंड क्र. २६४, सेक्टर-०३, क्षेत्र-१०० चौ.मी. हा भुखंड रद्द करून भूधारकांना दि.०८/०५/२०१८ रोजीच्या संगणकीय सोडतीमध्ये उलवे नोड येथील **भूखंड क्र. C-२९, सेक्टर-१५, क्षेत्र-१०० चौ.मी.** हा भूखंड इरादित करण्यात आला आहे.

सदर भूखंड वाटपास पात्र असलेल्या लाभार्थी भूधारक १) श्रीमती कृष्णाबाई गणा म्हात्रे, २) श्रीमती चंद्राबाई सावळाराम खोत, ३) कै. लक्ष्मीबाई उर्फ लखीबाई धर्मा म्हात्रे (मयत) वारस अ) श्री. शंकर धर्मा म्हात्रे व ४) कै. जानकीबाई उर्फ रुख्माबाई विठ्ठल पाटील (मयत) वारस श्री. भानुदास विठ्ठल पाटील यांनी सह दुय्यम निबंधक, उरण यांच्याकडे दिनांक २६/११/२००७ रोजी दस्तऐवजाचा अनुक्रमांक उरण-८१९३/२००७ अन्वये हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून उलवे नोड येथील भूखंड क्र. २६४, सेक्टर-०३, क्षेत्र-१०० चौ.मी. या भूखंडाचे लाभ १) श्री. अनंता देवराम खारकर, २) कै. नारायण देवराम खारकर (मयत) वारस अ) इंदिरा नारायण खारकर व ब) प्रमोद नारायण खारकर यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहेत.

हक्कसोड पत्रकांच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग दोन, असाधारण क्रमांक २९, प्राधिकृत प्रकाशन, महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिंग ॲक्ट - १९६६, नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) विनियम, २००८ मधील विनियम १० नंतर समाविष्ट करावयाच्या '**१०अ**' मधील **मूद्दा क्र. ii** अन्वये संबंधित हक्कसोडपत्रामध्ये ज्या भुखंडाचे हक्क हस्तांतरित केले आहेत त्याचा तपशील जसे की, नोड, भूखंड क्र., सेक्टर क्र. व क्षेत्र नमूद असणे आवश्यक आहे.

त्याप्रमाणे उपरोक्त नमूद हक्कसोडपत्रामध्ये संपादित जमिनीचा तपशील, साडेबारा टक्के योजने अंतर्गत येणारी पात्रता तसेच यापुर्वी इरादित उलवे नोड येथील भूखंड क्र. २६४, सेक्टर-०३, क्षेत्र-१०० चौ.मी. या भूखंडाचा तपशील नमूद केला आहे. तसेच प्रस्तावित मौजे उलवे निवाडा क्र.२७३, सर्व्हे क्र./हि.क्र. १०८/३, क्षेत्र-०-१०-९ हे.आर. या संपादित जमिनीचा उल्लेख केला आहे. परंतू यापुर्वी इरादित उलवे नोड येथील भूखंड क्र. २६४, सेक्टर-०३, क्षेत्र-१०० चौ.मी. या भुखंडावर अनधिकृत बांधकाम असल्याने सदर भुखंड रद्द करुन भूधारकांना दि.०८/०५/२०१८ रोजीच्या संगणकीय सोडतीमध्ये उलवे नोड येथील **भूखंड क्र. C-२९, सेक्टर-१५, क्षेत्र-१०० चौ.मी.** हा भुखंड इरादित करण्यात आला आहे.

उपरोक्त नोंदणीकृत हक्कसोड नुसार सिडकोकडून खालील व्यक्ती उपरोक्त नमूद उलवे नोड येथील **भूखंड क्र. C-२९, सेक्टर-१५, क्षेत्र-१०० चौ.मी.** भूखंडाचे वाटपपत्र स्विकारून करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरू शकतात.

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तींची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तींची नावे | शेरा |
|---|---|---|
| १) श्रीमती कृष्णाबाई गणा म्हात्रे,<br>२) श्रीमती चंद्राबाई सावळाराम खोत,<br>३) कै. लक्ष्मीबाई उर्फ लखीबाई धर्मा म्हात्रे (मयत) वारस<br>अ) श्री. शंकर धर्मा म्हात्रे व<br>४) कै. जानकीबाई उर्फ रुख्माबाई विठ्ठल पाटील (मयत) वारस<br>श्री. भानुदास विठ्ठल पाटील | १) श्री. अनंता देवराम खारकर,<br>२) कै. नारायण देवराम खारकर (मयत) वारस<br>अ) इंदिरा नारायण खारकर<br>ब) प्रमोद नारायण खारकर | सह दुय्यम निबंधक, उरण यांच्याकडे दिनांक २६/११/२००७ रोजी दस्तऐवजाचा अनुक्रमांक उरण-८१९३/२००७ अन्वये हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून उलवे नोड येथील भूखंड क्र. २६४, सेक्टर-०३, क्षेत्र-१०० चौ.मी. या भूखंडाचे लाभ १) श्री. अनंता देवराम खारकर, २) कै. नारायण देवराम खारकर (मयत) वारस अ) इंदिरा नारायण खारकर व ब) प्रमोद नारायण खारकर यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहेत. परंतू सदर उलवे नोड येथील भूखंड क्र. २६४, सेक्टर-०३, क्षेत्र-१०० चौ.मी. या भूखंडावर त्रयस्थ व्यक्तीचे बांधकाम असल्यामुळे सदर भुखंड रद्द करून भूधारकांना दि.०८/०५/२०१८ रोजीच्या संगणकीय सोडतीमध्ये उलवे नोड येथील **भूखंड क्र. C-२९, सेक्टर-१५, क्षेत्र-१०० चौ.मी.** हा भूखंड इरादित करण्यात आला आहे. |

वरील इरादित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार सोडले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे साडेबारा टक्के योजने संदर्भातील लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून **३० (तीस)** दिवसांच्या आत सर्व पुरावे योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील इरादित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी तथा**
**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/०३०/२०२४-२५


## चिंतामणराव केळकर विद्यालयाचा १०० टक्के निकाल

**अलिबाग : प्रतिनिधी**

येथील चिंतामणराव केळकर विद्यालयाने दहावीच्या परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. सलग १२व्या वर्षीही विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे. स्वरा अविनाश पाटील हिने ९७.६० टक्के मिळवून शाळेत प्रथम येण्याचा मान मिळवला.

दहावीच्या परीक्षेत चिंतामणराव केळकर विद्यालयाचे मराठी माध्यमाचे २० विद्यार्थी, सेमी इंग्रजी माध्यमाचे ४८ विद्यार्थी तर इंग्रजी माध्यमाचे ५३ विद्यार्थी असे एकूण १२१ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाले होते. हे सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यापैकी आठ विद्यार्थी ९० टक्केपेक्षा जास्त, ४४ विद्यार्थ्यांना ८० टक्केपेक्षा जास्त, ३४ विद्यार्थी ७० टक्केपेक्षा जास्त, तर २७ विद्यार्थी ६० टक्के मिळवून उत्तीर्ण झाले. आठ विद्यार्थी ५० टक्केपेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाले.

मराठी माध्यमात आर्या आठवले ८५ टक्के प्रथम, सेमी इंग्रजी माध्यमामध्ये मयुरेश पाटील ९३ टक्के प्रथम, इंग्रजी माध्यमध्ये स्वरा पाटील हिने ९७.६० टक्के प्रथम येण्याचा मान मिळवला.

## तनिष्का नगरकर ९७.८० टक्के मिळवून महाडमधून प्रथम



**महाड : प्रतिनिधी**

दहावीचा निकाल सोमवारी जाहीर झाला. महाडमधून केईएसची विद्यार्थिनी तनिष्का नगरकर हिने ९७.८० टक्के गुण मिळवून महाडमधून प्रथम येण्याचा मान मिळवला. भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर व कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे सन्मानचिन्ह देऊन अभिनंदन केले.

याच शाळेची तनिष्का शेट्टे ९७.४० टक्के द्वितीय, गुरुकुल स्कूलचा मयुर महेश नाझरे ९६.६० तृतीय तर केईएसची आर्या नाईक ९६.४० टक्के गुण मिळवून चतुर्थ क्रमांक पटकावला. भाजपचे तालुका सरचिटणीस महेश शिंदे, शहर अध्यक्ष निलेश तळवटकर, महिला मोर्चा शहराध्यक्षा नमीता दोशी, लीना शहा, अदिती ताडफळे, आप्पा सोंडकर, दरेकर, मिंडे, शिवसेनेचे शहरप्रमुख डॉ. चेतन सुर्वे, माजी नगरसेवक नितीन पावले, किशोर अग्रवाल, सिद्धेश पाटेकर, अर्बन बँकेचे संचालक समीर सावंत या सर्वांच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. या विद्यार्थ्यांना घडविणारे शिक्षक सुनील गांधी यांचादेखील सत्कार करण्यात आला.

# आयपीएल विजेत्या कोलकाताचा पराक्रम

## सर्वांत कमी सामने गमावणारा संयुक्तपणे पहिला संघ

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या १७व्या हंगामाचे विजेतेपद कोलकाता नाईट रायडर्स संघाने पटकावले. कोलकाताने अंतिम सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा आठ गडी राखून पराभव करीत तिसऱ्यांदा आयपीएल ट्रॉफीवर तिसऱ्यांदा नाव कोरले. आयपीएलमध्ये केकेआर संघाने १० वर्षांनंतर ट्रॉफी जिंकली आहे. यासह त्यांनी या मोसमात अशी कामगिरी केली, जी यापूर्वी आयपीएलमध्ये एकदाच पहायला मिळाली होती.



कोलकाता संघ गुणतालिकेत अव्वल स्थानावर राहिला. साखळी फेरीत केकेआरने १४पैकी नऊ सामने जिंकले होते आणि केवळ तीन सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला होता. त्याचवेळी पावसामुळे दोन सामने रद्द झाले. यानंतर कोलकाताने क्वालिफायर-१ सामना जिंकून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. शेवटी सनरायझर्स हैदराबादचा पराभव करून कोलकाता संघ तिसऱ्यांदा चॅम्पियन ठरला. म्हणजेच कोलकाताला या मोसमात एकूण तीन पराभवांना सामोरे जावे लागले.

आयपीएलच्या एका हंगामात सर्वांत कमी सामने गमावणारा कोलकाता नाइट रायडर्स संयुक्तपणे पहिला संघ ठरला आहे. याआधी २००८मध्ये खेळल्या गेलेल्या पहिल्या आयपीएल हंगामातही राजस्थान रॉयल्स संघाला केवळ तीन सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला होता. विशेष म्हणजे त्या मोसमात राजस्थान रॉयल्सनेही ट्रॉफीवर कब्जा केला होता. त्याचवेळी या यादीत दुसऱ्या स्थानावर गुजरात टायटन्सचा संघ आहे, ज्याने २०२२मध्ये खेळल्या गेलेल्या आयपीएल हंगामात केवळ चार सामने गमावले आणि तेदेखील चॅम्पियन बनले होते.

अंतिम सामन्यात सनरायझर्स हैदराबाद संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, जो केकेआरच्या गोलंदाजांनी चमकदार कागमगिरी करीत चुकीचा सिद्ध करताना हैदराबादला १८.३ षटकात ११३ धावांवर रोखले. त्यानंतर अवघ्या १०.३ षटकांत कोलकाताने लक्ष्य गाठले. लक्ष्याचा पाठलाग करताना व्यंकटेश अय्यरच्या बॅटमधून शानदार खेळी पहायला मिळाली. त्याने नाबाद अर्धशतक झळकावले.

# आयपीएल पुरस्कार विजेत्यांना एकूण ४६.५ कोटींचे बक्षीस वाटप

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमिअर लीगचे आणखी एक पर्व यशस्वीरित्या पार पडले. कोलकाता नाईट रायडर्सने यंदाच्या आयपीएलचे जेतेपद नावावर करताना १० वर्षांचा दुष्काळ संपवला. त्यांनी २०१२ व २०१४नंतर तिसऱ्यांदा ट्रॉफी जिंकली. केकेआरने अंतिम सामन्यात सनरायझर्स हैदराबादवर सहज विजय मिळवला. या विजेतेपदानंतर केकेआरला ट्रॉफीसह २० कोटी बक्षीस रक्कम दिली गेली, तर उपविजेत्या एसआरएचला १३ कोटी दिले गेले. यंदाच्या आयपीएलमध्ये एकूण ४६.५ कोटींच्या बक्षीस रकमेचे वाटप केले गेले.


राजस्थान रॉयल्स व रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू हे अनुक्रमे तिसरे व चौथे राहिले. संजू सॅमसनच्या संघाला सात कोटी आणि बंगळुरूला ६.५ कोटी रुपये दिले गेले. आरसीबीच्या विराट कोहलीने ऑरेंज कॅप, तर पंजाब किंग्सच्या हर्षल पटेलने पर्पल कॅप जिंकली. या दोघांना प्रत्येकी १० लाख रुपये दिले गेले. विराटने या पर्वात १५ सामन्यांत ६१.७५च्या सरासरीने सर्वाधिक ७४१ धावा केल्या. दुसरीकडे हर्षलने १४ सामन्यांत २४ विकेट्स घेतल्या.

सनरायझर्सचा नितीश कुमार रेड्डी हा इमर्जिंग प्लेअर ठरला, तर केकेआरच्या सुनील नरीनने मोस्ट व्हॅल्युएबल प्लेअरचा किताब पटकावला. नरीनने १५ सामन्यांत १८०.७४च्या स्ट्राईक रेटने ४८८ धावा चोपल्या. शिवाय त्याने गोलंदाजीत १७ विकेट्सही घेतल्या

**पुरस्कार विजेते**

ऑरेंज कॅप विराट कोहली (७४१ धावा), पर्पल कॅप हर्षल पटेल (२४ विकेट्स), मोस्ट व्हॅल्युएबल प्लेअर सुनील नरेन (४८८ धावा, १७ विकेट्स), सर्वाधिक चौकार ट्रॅव्हिस हेड (६४), सर्वाधिक षटकार अभिषेक शर्मा (४२), स्टायकर ऑफ द सिझन जॅक फ्रेझर-मॅकगर्क, इमर्जिंग प्लेअर नितीश कुमार रेड्डी, कॅच ऑफ द सिझन रमणदीप सिंग, फेअर प्ले अवॉर्ड सनरायझर्स हैदराबाद, पीच अॅण्ड ग्राऊंड अवॉर्ड हैदराबाद क्रिकेट असोसिएशन.

## गौतम गंभीरवर शाहरूख खान भलताच खूश; व्हिडीओ व्हायरल



**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएलची फायनल तिसऱ्यांदा जिंकल्यानंतर कोलकाता नाईट रायसर्ड संघाचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. यापैकी केकेआरचा मालक शाहरूख खान आणि मार्गदर्शक गौतम गंभीरच्या व्हिडीओने सर्वांच लक्ष वेधले आहे.

केकेआरने अंतिम सामना जिंकल्यानंतर सगळेच खूश दिसत होते. दरम्यान, संघाचा मालक शाहरूख खानही मैदानावर उपस्थित होता. शाहरूखचा संपूर्ण परिवार या सामन्यासाठी चेन्नईमध्ये आला होता. संघाच्या विजयानंतर शाहरूख खूप आनंदी दिसत होता. त्याने केकेआरच्या सर्व खेळाडूंची आणि कोचिंग स्टाफची भेट घेतली. नंतर त्याने केकेआरचा मार्गदर्शक गौतम गंभीरला मिठी मारली व त्याच्या कपाळावर किस केले, ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

गौतम गंभीर यंदाच्या आयपीएलसाठी केकेआर संघात मेंटॉर म्हणून परतला. त्यानंतर संघाने वेगळा खेळ दाखवला आणि ट्रॉफी जिंकण्यातही संपूर्ण संघाने आपले १०० टक्के योगदान दिले. त्यामुळे आता गौतम गंभीरला भारतीय संघाचे प्रशिक्षक बनवण्याच्या चर्चेला वेग आला आहे. केकेआरच्या विजयानंतर गंभीरने बीसीसीआयचे सचिव जय शाह यांची भेट घेतली, त्याचेही फोटो व्हायरल होत आहेत.

## गंभीरने केला कुणालाही न जमलेला करिष्मा

**मुंबई : प्रतिनिधी**

कोलकाता नाईट रायडर्सने १० वर्षांनंतर आयपीएलचे जेतेपद पटकावले. २०१२ व २०१४मध्ये त्यांनी गौतम गंभीरच्या नेतृत्वाखाली आयपीएल चषक उंचावला होता आणि आता गंभीर हा त्यांचा मेंटॉर आहे. कर्णधार व मेंटॉर म्हणून आयपीएल ट्रॉफी जिंकणारा गंभीर हा पहिलाच खेळाडू आहे.

हैदराबादने फायनलमध्ये लोटांगण घातले. कोलकाताच्या मिचेल स्टार्क (२-१४), हर्षित राणा (२-२४) व आंद्रे रसेल (३-१९) यांच्या माऱ्यासमोर हैदराबादचा संघ १८.३ षटकांत ११३ धावांत तंबूत परतला. प्रत्युत्तरात पॅट कमिन्सने दुसऱ्याच षटकात सुनील नरीनला (६) झेलबाद करून माघारी पाठवले, मात्र वेंकटेश अय्यर आणि रहमनुल्लाह गुरबाज यांनी ४५ चेंडूंत ९१ धावा जोडून विजय निश्चित केला. गुरबाज ३९ धावा करून बाद झाला. वेंकटेश ५२ धावांवर नाबाद राहिला आणि कोलकाताने १०.३ षटकांत सामना जिंकला.

## कडसुरे संघाने जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा जिंकली

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे विभागीय आध्यात्मिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा व सामाजिक संस्थेच्या वतीने कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने आयोजित जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत चोडेश्वरी कडसुरे संघाने बाजी मारली. या स्पर्धेतील मुख्य आकर्षण ठरले प्रो-कबड्डीतील बंगाल वॉरियर्सचा खेळाडू श्रीकांत जाधव व गुजरात टायटन्सचा आरकम शेख.



स्पर्धेचे उद्घाटन राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते झाले. स्पर्धेस भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष व माजी आमदार धैर्यशील पाटील, विष्णू पाटील, उद्योजक रामशेठ घरत, राष्ट्रवादीचे नेते नरेंद्र जैन, दिलीप टके, शिवराम शिंदे, सदानंद गायकवर, मनसे जिल्हा संघटक गोवर्धनभाई पोलसानी, भाजप जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, सरचिटणीस मिलिंद पाटील, गवळी समाज जिल्हाध्यक्ष राजेश मेहतर, प्रफुल्ल वालेकर, शिवसेना युवा नेते मनोज खांडेकर, पाली उपनराध्यक्ष अरिफ मन्यार, राष्ट्रवादीचे युवा नेते सचिन कळसकर, विनय गोळे, प्रथमेश काळे, राजेंद्र शिंदे, यशवंत हळदे, कबड्डीचे राष्ट्रीय पंच सुधीर चव्हाण, सतिश गायकवाड आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेत द्वितीय क्रमांक धावीर पोस्ट रोहा, तृतीय जय बजरंग रोहा आणि चतुर्थ क्रमांक जोगेश्वरी नागोठणे संघांने मिळविला. विजेत्या संघांना रोख रक्कम व आकर्षक चषक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे सर्वोत्कृष्ट खेळाडू निखिल शिर्के (कडसुरे), उत्कृष्ट चढाई अनिरुद्ध (रोहा), उत्कृष्ट पकड राज मोरे (रोहा) तसेच पब्लिक हिरो म्हणून सत्यानंद पिंगळे (नागोठणे) यांना पारितोषिक देण्यात आले.

## कबड्डी स्पर्धेत रोहा, पनवेल, नांदाईपाडा संघ विजेते

**अलिबाग : प्रतिनिधी**

साई क्रीडा मंडळ व साई महिला मंडळ यांच्यातर्फे आयोजित जिल्हस्तरीय कबड्डी स्पर्धेत पुरुष गटात जय बजरंग रोहा संघाने विजेतपद पटाकवले. महिला गटात कर्नाळा स्पोर्ट्स पनवेल संघ विजेता ठरला, तर पंचक्रोशी गटात नांदाईदेवी नांदाईपाडा संघाने बाजी मारली.



रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने झिराड येथे झालेल्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत पुरुष गटात ॐकार वेश्वी संघ उपविजेता ठरला. पांडबादेवी रायवाडी संघाने तृतीय, तर मरीदेवी धेरंड संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला. सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून राकेश गायकवाड (रोहा) याला गौरविण्यात आले. उत्कृष्ट चढाईचे पारितोषिक अनुराग सिंग (वेश्वी) याला, तर उत्कृष्ट पकडीचे पारितोषिक दीपक कासारे (धेरंड) याला देण्यात आले. पब्लिक हिरो म्हणून प्रशांत जाधव (रायवाडी) याची निवड करण्यात आली.

महिला गटात ॐकार वेश्वी संघाला उपविजेतपदावर समाधान मानावे लागले. दत्तात्रेय स्पोर्ट्स पनवेल संघाने तृतीय व टाकादेवी मांडवा संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला. सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून रचना म्हात्रे (पनवेल) हिची निवड करण्यात आली. उत्कृष्ट चढाईचे पारितोषिक ईशा पाटीलला (वेश्वी) व उत्कृष्ट पकडीचे परितोषिक हर्षदा पराटे (पनवेल) हिला देण्यात आले. पब्लिक हिरोचा मान विदिशा म्हात्रे (मांडवा) हिने मिळवला.

पंचक्रोशी पुरुष गटात जय हनुमान वाघोडे संघ उपविजेता ठरला. गावदेवी वावे संघाने तृतीय, तर नागेश्वर आवास संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला. सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून तुषार पाटील (नांदाईपाडा) याची निवड करण्यात आली. उत्कृष्ट चढाईचे पारितोषिक प्रणव इंदूलकर (वाघोडे) व उत्कृष्ट पकडीचे परितोषिक श्रीमेश गावंड (वावे) याला देण्यात आले. पब्लिक हिरो म्हणून अक्षय कवळे (आवास) याला गौरविण्यात आले. भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.









## ग्राऊंड स्टाफ कर्मचाऱ्यांना मोठे बक्षीस जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कोलकाता नाईट रायडर्सने सनरायझर्स हैदराबाद संघाचा पराभव करून तिसऱ्यांदा आयपीएलचा किताब जिंकला. आयपीएल विजेत्या संघाला बक्षीस म्हणून २० कोटी रुपये मिळाले. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने खेळाडूंसोबत ग्राऊंड स्टाफ आणि क्युरेटर्स यांनादेखील चांगले मानधन दिले आहे.

ग्राउंड स्टाफच्या कर्मचाऱ्यांना २५ लाख रुपये मिळणार आहेत. ही रक्कम १० मैदानातील कर्मचाऱ्यांना मिळेल, तर तीन अतिरिक्त स्टेडियममधील कर्मचाऱ्यांना १० लाख रुपये मिळणार आहेत. बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी ही घोषणा केली.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com